## रायगड जिल्ह्यात जोरदार पाऊस; आज रेड अलर्ट



**अलिबाग :** गणेशोत्सवात विश्रांती घेतलेल्या पावसाने रायगड जिल्ह्यात पुनरागमन केले असून गेले दोन दिवस पाऊस पडत आहे. काही भागात मुसळधार पाऊस पडला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. भारतीय हवामान विभागाकडून रायगड जिल्ह्यासाठी बुधवारी (दि. २५) रेड अलर्टची पूर्वसूचना देण्यात आली आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. जिल्ह्याच्या काही भागात सोमवारी जोरदार पाऊस पडला. मंगळवारीही दमदार पाऊस पडला. दोन दिवस अचानक पडलेल्या पावसामुळे रायगडकरांची तारांबळ उडाली. दक्षिण रायगडात ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस बरसला, तर उत्तर रायगडात अलिबाग, पेण, पनवेल परिसरात मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी बरसल्या. दिवसभर ढगाळ वातावरण होते.

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक ६८
www.ramprahar.com

बुधवार, २५ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

**अंतरंग**

राज्यातील २१ सिंचन प्रकल्पांना सुधारित मान्यता/२
चिरनेर येथील शौर्यशाली जंगल सत्याग्रह/४
माथेरानमध्ये ई-रिक्षांची संख्या वाढवण्याची गरज/७

# तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांना मंजुरी

## ३०५ कोटी रुपयांची तरतूद; पंढरपुरातील कामांचाही समावेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विविध तीर्थक्षेत्र विकासाच्या सुमारे ३०५ कोटी ६३ लाख रुपयांच्या आराखड्यांना मंगळवारी (दि. २४) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यात श्री क्षेत्र पंढरपूर येथील दर्शन मंडप व दर्शन रांग या सुविधेसाठी १२९ कोटी ४९ लाख रुपयांच्या कामांचाही समावेश आहे.



सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मदत व पुनर्वसनमंत्री अनिल पाटील, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, समाधान अवताडे, सरोज अहिरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

भगूर (जि. नाशिक) येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनावर आधारित थीमपार्क साकारण्यात येणार आहे. अमळनेर (जि. जळगाव) येथील मंगळग्रह देवस्थान, कोयना (जि. सातारा) जलाशय मुनावळे येथील जलक्रीडा पर्यटन सुविधा, दर्यापूर (जि. अमरावती) येथील संत गाडगेबाबा यांची कर्मभूमी ऋणमोचन, श्री क्षेत्र गहिनीनाथगड (जि. बीड) या विकास आराखड्यातील कामांना मान्यता देण्यात आली. याशिवाय मुंबईवरील २६/११च्या दहशतवादी हल्ल्यात अजमल कसाब या सशस्त्र दहशतवाद्यास जिवंत पकडणाऱ्या शहीद तुकाराम ओंबळे यांच्या केंडबे (जि. सातारा) येथील मूळ गावी स्मारक उभारण्यासाठी तरतुदीस बैठकीत मान्यता देण्यात आली.

नागपूर शहरातील लक्ष्मीनारायण शिवमंदिर-नंदनवन, कुत्तेवालेबाबा मंदिर आश्रम शांतीनगर आणि मुरलीधर मंदिर पारडी विकास आराखड्यासाठीही निधीच्या तरतुदीस या बैठकीत मान्यता देण्यात आली.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेलच्या ग्रामीण भागात विकासपर्व सुरूच

## भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कामांचा शुभारंभ

(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात सुमारे एक कोटी ३० लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ मंगळवारी (दि. २४) झाला. या कामांचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. ही सर्व कामे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विविध निधींमधून करण्यात येणार आहेत.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा मतदारसंघात अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार त्यांच्या माध्यमातून २० लाख रुपयांच्या निधीमधून मालडुंगे ग्रामपंचायतीमधील सतिचीवाडी येथे जोडरस्ता, १० लाख रुपयांच्या निधीमधून कोंबलटेकडी येथे सामाजिक सभागृह, १० लाख रुपयांच्या निधीतून वाघाचीवाडी येथे सामाजिक सभागृह, १० लाख २९ हजार रुपयांच्या निधीतून वाघाचीवाडीकडे जाणारा रस्ता, १८ लाख रुपयांच्या निधीतून धोदाणी येथे साकव, आठ लाख रुपयांच्या निधीतून धोदाणी येथे विष्णू पारधी यांच्या घरापासून ते नामदेव चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता, आठ लाख रुपयांच्या निधीतून धोदाणी बसस्टॉप ते बाळाराम भगत यांच्या घरापर्यंत रस्ता, आठ लाख रुपयांच्या निधीतून बाळा चौधरी यांच्या घरापासून पद्माकर चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता, १० लाख रुपयांच्या निधीतून वाजे ग्रामपंचायतीमधील देविराज कॉलनीकडे जाणारा रस्ता, १० लाख रुपयांच्या निधीतून वाजे येथे विसर्जन घाट, आठ लाख रुपयांच्या निधीतून वाजे येथे विठ्ठल पाटील ते गणपत मदने यांच्या घरापर्यंत रस्ता तसेच १० लाख रुपयांच्या निधीमधून सांगटोली पेरुचीवाडी जाणारा रस्ता तयार करण्यात येणार आहे. या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित इतर मान्यवरांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमांना भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, सुनील पाटील, विश्वजीत पाटील, राजा भोईर, मालडुंगेचे सरपंच सीताराम चौधरी, रोशन पाटील, रवींद्र भालेकर, श्याम भालेकर, रूपेश भोईर, गणपत पाटील, अंबाजी पाटील, योगेश पाटील, शशिकांत भगत, मेघनाथ भगत, पदू वाघ, हर्षदा चौधरी, उपसरपंच जनार्दन निरगुडा, अर्जुन कांबडी, उषा वारगडा, काळुराम वाघ, जोमा निरगुडा, गणपत वारगडा, कमल्या कांबडी, सीताराम कांबडी, कानू हाशाविर, दिलीप पाटील, महादू सांबरी, राघो भस्मा, शनिवार खंडवी, माई खंडवी, राजू वाघ, विष्णू पारधी, ताई भस्मा, कमळू चौधरी, लक्ष्मण चौधरी, संतोष भगत, बाळाराम भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# महिला पदाधिकाऱ्यांनी जबाबदारी यशस्वीपणे बजवावी -सुलक्षणा सावंत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लाडकी बहीण योजनेसह लोकहिताच्या अनेक योजना राज्यात सुरू आहेत. या योजना अशाच सुरू राहण्यासाठी राज्यात विद्यमान भाजप महायुतीचे सरकार आवश्यक आहे. त्यामुळे महिलांनी आपली ताकद येत्या विधानसभा निवडणुकीतही लावून जबाबदारी यशस्वी बजवावी, असे आवाहन गोवा राज्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या सुविद्य पत्नी आणि भाजप महिला मोर्चाच्या कोकण प्रभारी सुलक्षणा सावंत यांनी येथे केले.




भाजप उत्तर रायगड महिला पदाधिकाऱ्यांची बैठक मंगळवारी (दि. २४) पनवेल येथे झाली. त्या वेळी सावंत मार्गदर्शन करीत होत्या. या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महिला मोर्चा प्रदेश सरचिटणीस मंजुषा कुद्रमोती, भाजप जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, वृषाली वाघमारे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, सरचिटणीस संध्या शारबिद्रे, पनवेल तालुकाध्यक्ष कमला देशेकर, शहराध्यक्ष राजेश्री वावेकर आदी पदाधिकारी उपस्थित होत्या. (पान २ वर..)

## एकत्रितपणे काम करा -ना. शाह

**नागपूर :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुती म्हणून एकत्र येत काम करा तसेच बूथपातळीवर जाऊन सक्रिय रहा, अशा शब्दांत भाजप नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी (दि. २४) नागपूरमध्ये पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पक्षाचे राज्य प्रभारी भूपेंद्र यादव, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिव प्रकाश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, निवडणूक संचालन समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## निवडक

### नक्षलवादी चळवळीला हादरा; कमांडर रूपेश मडावी चकमकीत ठार

**गडचिरोली :** महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवर पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत नक्षलींच्या दंडकारण्य विशेष विभागीय समिती सदस्य आणि कंपनी १०चा कमांडर रूपेश मडावीसह तीन नक्षलवादी ठार झाले आहेत. रूपेशवर तीन राज्यांचे मिळून ७५ लाखांहून अधिक बक्षीस होते. गडचिरोलीतील नक्षलवादी चळवळीतील प्रमुख नक्षल नेता म्हणून त्याची ओळख होती.

### विवेक पाटीलांच्या जामिनासंबंधी निकालाची प्रतीक्षा कायम

**पनवेल :** कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या सुमारे ५४३ कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील निकालासंदर्भातील प्रतीक्षा अद्याप कायम आहे. तळोजा तुरुंगात असलेले घोटाळ्याचे सूत्रधार पाटील यांच्या जामिनावरील निकालाबाबत पनवेल जिल्हा न्यायालयात मंगळवारी (दि. २४) कोणतीही कार्यवाही झाली नाही. कोर्टाचे कामकाज संपतेवेळी हे प्रकरण पटलावर आले असता न्यायाधीश वडने यांनी २६ सप्टेंबर ही पुढील तारीख दिली.

# महापुरुषांचा आदर्श घ्या -लोकनेते रामशेठ ठाकूर

## महात्मा फुले महाविद्यालयात कर्मवीर जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मंगळवारी (दि. २४) डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी समारंभाचे अध्यक्ष संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संस्थेशी असणारे ऋणानुबंध व्यक्त करीत कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, महात्मा गांधी या महापुरुषांनी घालून दिलेला आदर्श घेतला पाहिजे तसेच साधी राहणी व उच्च विचारसरणी अंगीकारल्यास जीवनामध्ये यशस्वी होता येते, असे प्रतिपादन केले.



या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे (उच्च शिक्षण) व प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे (ऑडिटर) यांच्यासह जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, डी.बी. पाटील महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर.ए. पाटील, डॉ. एन.बी. पवार आदी उपस्थित होते

प्रमुख पाहुणे डॉ. शिवलिंग मेनकुदळे म्हणाले की, स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव निर्माण होण्यासाठी कला व क्रीडेस शिक्षणाची जोड असणे आवश्यक आहे. स्वावलंबी शिक्षण हे कर्मवीरांचे व्रत विद्यार्थ्यांनी अंगीकारणे गरजेचे आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत कर्मवीरांचे योगदान खूप मोठे असून त्यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती केली. ज्ञानाची गंगा गोरगरीबांपर्यंत पोहचविली. कर्मवीरांनी नानाविध समस्यांना सामोरे जात रयतेच्या शिक्षणाचा धनुष्य यशस्वीरित्या पेलला. त्यांनी समाजासाठी केलेला त्याग, निस्पृहपणे केलेली सेवा याची आपण आठवण ठेवली पाहिजे व आपल्याला मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन त्याचे सोने केले पाहिजे.

डॉ. राजेंद्र मोरे यांनी सांगितले की, प्रत्येक व्यक्ती हा आदर्श माणूस, आदर्श शिक्षक व आदर्श नागरिक झाला पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी थोर महापुरुषांची चरित्रे वाचून त्यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत. (पान २ वर..)

# सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांची नवी मुंबई विमानतळ प्रकल्पस्थळी भेट

## पंतप्रधानांच्या उपस्थितीत होणार सुखोई विमानाची चाचणी

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाचे नवनियुक्त अध्यक्ष आमदार संजय शिरसाट यांनी मंगळवारी (दि. २४) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पस्थळाला भेट देऊन सद्यस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर ५ ऑक्टोबरला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीमध्ये हवाई दलाचे लढाऊ विमानाची (सुखोई) चाचणी विमानतळावर घेण्यात येणार असल्याची घोषणा शिरसाट यांनी सिडको भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केली.



पाहणी दौऱ्यात सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, दिलीप ढोले, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्प व विशेष प्रकल्प) शीला करुणाकरन आणि विमानतळ प्रकल्पाशी संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. प्रकल्पाच्या गतिमान अंमलबजावणीकरिता कालमर्यादेमध्ये कामे पूर्ण करण्याचे निर्देश सिडको अध्यक्ष आमदार शिरसाट यांनी दिले. ५ ऑक्टोबरला पंतप्रधानांच्या उपस्थितीत हवाई दलाचे विमान यशस्वीरित्या धावपट्टीवर उतरल्यानंतर हे विमानतळ मार्च महिन्यात प्रादेशिक वाहतुकीसाठी खुले करण्याचा मानस आहे. त्यानंतर जून महिन्यात आंतरराष्ट्रीय विमाने या धावपट्टीवरून उडावित, असे नियोजन अदानी समूह आणि सिडको मंडळाचे असणार आहे.

# रायगडात ८६ टक्के कुटुंबांना नळ जोडणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागात जलजीवन मिशनची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून जिल्ह्यातील पाच लाख ४८ हजार ६२० कुटुंबांपैकी चार लाख ७१ हजार ८२६ म्हणजेच ८६ टक्के कुटुंबांना नळ जोडणी देण्यात आली आहे. त्यांना पाणीपुरवठा सुरू आहे.



केंद्र सरकारने जलजीवन मिशन हाती घेतले आहे. या अंतर्गत प्रत्येक घरात नळाने पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे. या योजनेच्या माध्यमातून सुरुवातीला ज्या घरांमध्ये नळ कनेक्शन आहे, त्या घरांची माहिती संकलित करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ज्या घरांमध्ये वैयक्तिक नळ कनेक्शन नाही अशा घरांना कनेक्शन देण्यात येत आहे. यामध्ये उरण, म्हसळा, खालापूर तालुक्यातील १०० टक्के कुटुंबांना नळ कनेक्शन पूर्ण झाले आहे.

अलिबाग तालुक्यात ७१ हजार ३६४पैकी ५६ हजार १३२ कुटुंबांना (७८.६७%), कर्जतमध्ये ५४ हजार ५०९पैकी ४१ हजार ७९९ कुटुंबांना (७६.६८%), खालापुरात सर्व म्हणजे ३६ हजार ४७ हजार (१००%), महाड ४२ हजार ४९९पैकी ३६ हजार ९४१ (८६.९२%), म्हसळा सर्व १४ हजार ५६५ हजार (१००%), मुरूड १६ हजार ४२३पैकी १५ हजार २६५ (९२.९५%), पनवेल ८१ हजार ८३०पैकी ७२ हजार ६०५ (८८.७३%), पेण ४५ हजार ६७पैकी २९ हजार १९५ (६४.७८%), पोलादपूर १६ हजार ५०३पैकी १३ हजार २९७ (८०.५७%), सुधागड १५ हजार ८६५पैकी १२ हजार ४४५ (७८.४४), तळा ११ हजार ४९१पैकी १० हजार ३९६ (९०.४७%), उरण सर्व ३६ हजार ३०० (१००%), रोहा ४२ हजार ६७०पैकी ३७ हजार १९१ (८७.१६%), माणगाव ४२ हजार १०४पैकी ३९ हजार ८१० (९४.५५%), श्रीवर्धन तालुक्यात २१ हजार ३८३पैकी १९ हजार ८३८ (९२.७७%) कुटुंबांना नळ जोडणी मिळाली आहे.

# एक्स्प्रेस वेवर सात वाहनांचा अपघात; तीन जण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत भाताण बोगद्याजवळ मंगळवारी (दि. २४) पहाटे २.३०च्या सुमारास चालकाचे नियंत्रण सुटल्याने कंटेनर मार्गावर आडवा झाला. त्यामुळे थांबलेल्या पाच वाहनांना पाठीमागून आलेल्या ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

चालक अरबाज अली (वय २१, उत्तर प्रदेश) आपल्या ताब्यातील कंटेनर (एमएच ४३ बीएक्स ००३६) पुणे बाजूकडे घेऊन जात असताना हे अवजड वाहन डिव्हायडरला धडकून दुसऱ्या लेनवर आडवे झाले. या वेळी चालकाने उडी मारल्याने त्याच्या पायाला गंभीर दुखापत झाली. कंटेनर मार्गावर आडवा झाल्याने पीकअप टेम्पो (एमएच ११ डीक्यू १४८१), हुंडाई कार (एमएच ४७ वाय ७०२८), इनोव्हा कार (एमएच १२ जीझेड ६४१८), इर्टिगा कार (एमएच १४ एचयू १६८२), इनोव्हा कार (एमएच ४६ बीए ६६३६) अशी पाच वाहने थांबली होती. या वेळी पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने (आरजे १४ जीजे ७२८८) पुढे उभ्या असलेल्या वाहनांना धडक दिली. यानंतर ट्रकचालक पळून गेला. या अपघातात दोन कारमधील आरबोन निशा शेख आणि मिनाक्षी महाजन जखमी झाले. जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# मुश्ताक अंतुले यांची मौलाना आझाद महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती

## पदभार स्वीकारला

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे माजी अध्यक्ष, माजी आमदार व राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांचे विश्वासू मुश्ताक अंतुले यांची मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



महायुती सरकारने कोकणातील एका मुस्लिम चेहऱ्याला या महामंडळात काम करण्याची संधी दिल्याने समाज बांधवांतून समाधान व्यक्त होत आहे. दरम्यान, अंतुले यांनी मंगळवारी (दि. २४) पदभार स्वीकारला.

लोकसभा निवडणुकीत मुश्ताक अंतुले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुतीतील सर्व नेतेगणांनी अंतुले यांच्यावर विश्वास दाखवत त्यांची मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड केली. त्यांनी आपल्या पदाचा पदभार स्वीकारला आहे. याबद्दल महायुतीमधील प्रमुख नेते आणि मुस्लिम समाज बांधवांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# २१ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता

## प्रकल्प पूर्ण करून सिंचन क्षमता वाढवावी –उपमुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

जलसंपदा विभागाच्या सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित नियामक मंडळाच्या बैठकीमध्ये बांधकामाधीन २१ प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता मंगळवारी (दि.२४) देण्यात आल्या.

राज्यात मोठे, मध्यम, लघू प्रकल्प व साठवण तलावांची कामे सुरू आहेत. सिंचनासाठी बळीराजाला मुबलक पाणी उपलब्धततेसाठी प्रकल्पांच्या कामांना गती द्यावी. बळीराजाला सुखी, समृद्धी करण्यासाठी राज्याची सिंचन क्षमता वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण करून राज्याच्या सिंचन क्षमतेत वाढ करावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

वर्धा जिल्ह्यातील आष्टी, वाढोणा–पिंपळखुटा या नवीन उपसा सिंचन योजनांना मान्यता देण्यात आली, तसेच निम्न वर्धा प्रकल्पांतर्गत महाजनको यांच्यामार्फत ७३२ हेक्टर जलाशयाच्या पृष्ठभागाचा वापर करून तरंगता सौरऊर्जा



प्रकल्प प्रस्तावित आहे. यामधून अंदाजे ५०५ मेगाव्हॅट वीजनिर्मिती होणार असून या तरंगत्या सौरऊर्जा प्रकल्पालाही मान्यता देण्यात आली.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वाढवण बंदरामुळे पालघर जिल्ह्याचा झपाट्याने विकास होणार असल्यामुळे या भागात नागरीकरण वाढणार आहे. या भागात भविष्यात वाढणारी लोकसंख्या विचारात घेऊन पाणीपुरवठ्यासाठी नवीन पाण्याचा स्त्रोत निर्माण करणे आवश्यक आहे. मुंबई महानगर प्रदेशातील सध्याची लोकसंख्या, भविष्यात वाढणारी लोकसंख्या, सद्यस्थितीत उपलब्ध असलेले पाणी, भविष्यातील पाण्याची गरज या सर्वांचा अभ्यास करून नियोजन करण्यात यावे. एकंदरीत सर्वंकष नियोजनासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात यावी. त्या पद्धतीने बृहत आराखडा तयार करण्यात यावा.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळाकडील ठेव तत्त्वावरील काळू प्रकल्प ठाणे, उल्हासनगर, डोंबिवली या भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी फायदेशीर ठरणारा आहे. सुसरी प्रकल्पाचे काम पूर्ण करून यामध्ये वाढवण बंदरासाठी पाण्याचे आरक्षणाबाबत पडताळणी करण्यात यावी. सुसरी प्रकल्पासाठी निधी जवाहनरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टकडून मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. वाढवण बंदरामुळे या परिसरात उद्योग, मालवाहतूक, गोदाम आदी वाढणार आहे. त्यामुळे रोजगारार्थ मोठ्या संख्येने लोक या भागात येणार आहे. त्यामुळे भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन सुसरी प्रकल्पाचे काम पूर्ण करावे, असे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सुधारित प्रशासकीय मान्यता व विशेष दुरूस्ती प्रस्ताव मान्यता प्रकल्पांची कामे विहीत कालावधीत पूर्ण करावी. जलसंपदा विभागाने निधी मागणी प्रस्ताव, प्रशासकीय मान्यता प्रस्ताव ही एकच पद्धत ठेवावी. याविषयी कामकाज गतीने व समन्वयाने होण्यासाठी एक प विकसित करावे, अशा सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

# सरकार महिला सक्षमीकरणावर भर देणारे –सुलक्षणा सावंत

**पेण : प्रतिनिधी**

सरकारने महिलांसाठी लाडकी बहीण ही योजना आणून आपल्या खात्यात पैसेही जमा केले आहेत. याकरिता सरकारने ४६०कोटींची तरतूद केल्याने ही योजना बंद होणारी नाही. भाजप सरकार महिलांच्या सक्षमीकरणावर भर देणारे असल्याचे प्रतिपादन भाजपच्या कोकण महिला मोर्चाच्या प्रभारी सुलक्षणा सावंत यांनी पेण वाशी येथे केले.

भाजपची राष्ट्रीय प्रवास आढावा बैठक पेण वाशी येथील जगदंबा मंदिरात झाली. या बैठकीला भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, जि.प.माजी अध्यक्ष निलिमा पाटील, जिल्हा सरचिटणीस वैशाली मपारा, माजी नगराध्यक्ष प्रीतम पाटील, ट्रि हाऊस एज्युकेशनच्या अध्यक्ष शर्मिला पाटील, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, वाशी सरपंच संदेश ठाकूर, पुजा पाटील, माजी





सरपंच गोरख पाटील आदी उपस्थित होते.

त्यांनी सांगितले की, या मतदारसंघात आमदार रविशेठ पाटील आणि खासदार धैर्यशील पाटील विकासाची गाडी बरोबर घेऊन जात असताना आपल्याला त्यात प्रवास करायचा आहे. गोवा हा कोकणातलाच भाग असल्याने तिथेही गेली १२ वर्षे गृहआधार ही योजना महिलांसाठी सुरू आहे. त्यामुळे विरोधक नुसते बोलतात. करून काही दाखवत नसल्याने त्यांना सत्तेपासून पायउतार व्हावे लागले असल्याचा टोला त्यांनी महाविकास आघाडी सरकारला लगावला. शर्मिला पाटील यांनी, पेण महिला आघाडीच्या कार्याला सॅल्युट असल्याचे सांगितले.

# पिरकोन येथे कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीनिमित्त पालखी

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील पिरकोन येथील कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रविवारी (दि.२२) पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या पालखी सोहळ्यात विद्यालयाचे चेअरमन जीवन गावंड यांच्या हस्ते पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील



यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सरपंच कलावती पाटील, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य ए. डी. पाटील, रमाकांत जोशी, दहागाव माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष मुकुंद गावंड, अनुरुद्र पाटील, अनिल पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्या राजश्री म्हात्रे, प्रा. प्रमोद म्हात्रे, शाळेच्या प्राचार्या सुजाता बल्लाळ शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सोमवारी (दि.२३) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ३६७ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख ६७ हजार ६०० रुपये इतका दंड आकारला आहे.

# आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली उपयुक्त –जिल्हाधिकारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

नागरिकांना त्यांच्या मोबाईल किंवा संगणकाच्या माध्यमातून तक्रार दाखल करण्याची सुविधा प्रदान करण्यासाठी आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली २.०ची निर्मिती करण्यात आली आहे. यामुळे आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली उपयुक्त असल्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

आपले सरकार तक्रार निवारण २.० प्रणालीच्या वापराबाबत सोमवारी (दि.२३) जिल्हाधिकारी कार्यालययेथे आयोजित प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते.



तक्रारींचा निपटारा जलद गतीनी करण्याकरिता आपले सरकार तक्रार निवारण प्रणालीमध्ये नव्याने काही बदल करण्यात आले आहेत. या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारींचा संवेदनशीलपणे निपटारा होण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या संकल्पनेतून आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली २.०चे जिल्हास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. कामकाजात पारदर्शकता वाढविण्यासाठी आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली उपयुक्त ठरणार आहे असे आपले सरकार ई–गव्हरनन्स तज्ज्ञ देवांग दवे यांनी सांगितले, तसेच आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली २.०च्या वापराचे प्रात्यक्षिक आपले सरकार तांत्रिक प्रतिनिधी शुभम पै यांनी दिले.

हे प्रशिक्षण आपले सरकार ई–गव्हर्नन्स तज्ज्ञ देवांग दवे, आपले सरकार सहाय्यक विनोद वर्मा, आपले सरकार तांत्रिक प्रतिनिधी शुभम पै यांच्यामार्फत घेण्यात आले.

जिल्हा पोलीस अधीक्षक रायगड सोमनाथ घार्गे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ. रवींद्र शेळके, तहसीलदार महसूल चंद्रसेन पवार, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार, विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

# राजपुरी मुस्लिम मोहल्ल्यात शेकापला खिंडार

## आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश

**मुरूड : प्रतिनिधी**

राजपुरी ग्रामपंचायतीमधील मुस्लिम मोहल्यात शेकापमध्ये गेले ४० वर्षे सोबत असणाऱ्या मुस्लिम बांधवांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवत शिवसेनेत प्रवेश केला.

आमदार महेंद्र दळवी यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे स्वागत केले. या प्रवेशकर्त्यांमध्ये जंजिरा पर्यटक सोसायटीचे चेअरमन इस्माईल अदमने, शाहनवाज डॉक्टर, मोउज्जम काद्री, सज्जाद दावरे, दानिश दावरे, रिजवान अदमने, इरफान अदमने, प्रवेश कारभारी, सलील कासकर,



अब्दुल पठाण, फैजल काद्री, राशिद सिद्दिक, इम्रान अरब, साकिब तळवस्कर, जैद हवालदार, सिराज डॉक्टर, नियाजुद्दिन हकेब्रदर, अब्दुलसत्तार हवालदार, अब्दुल पठाण, अखलाक आदमने आदींचा समावेश आहे.

या वेळी आमदार महेंद्र दळवी यांनी, शिवसेनेला राजपुरी मुस्लिम मोहल्ल्यात प्रवेश देऊन माझ्यावर जो विश्वास दाखवला त्याला कधीही तडा जाऊ देणार नाही. राजपुरीमधील सर्व प्रश्न सोडविणार असून कोणतीही कमतरता भासू देणार नाही. मी सर्व समाजाला सोबत घेऊन जाणारा आहे. लोकसभेत येथून कमी मतदान झाले असले तरी विधानसभा निवडणुकीत मला भरभरून मतदान होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमासाठी जिल्हा नियोजन मंडळ सदस्य संतोष निगडे, विघ्नेश माळी, शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, मुरूड तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, शिवसेनेचे जिल्हा संघटक दिनेश मिणमिणे, मुरूड तालुका उपप्रमुख मनोज कमाने, शहरप्रमुख संदीप पाटील, श्रीकांत सुर्वे, गिरीश साळी, गणेश मोंनाक, समीर दौनाक, सी. एम. ठाकूर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजप खालापूर मंडळ आढावा बैठक

## आमदार संकल्प अमोनकर यांचे मार्गदर्शन; अनेक कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश



**खालापूर : रामप्रहर वृत्त**

महड येथे गोवा राज्याचे मुरगाव विधानसभेचे आमदार संकल्प अमोनकर यांच्या उपस्थितीत खालापूर तालुका भाजप मंडळाची बैठक पार पडली. या वेळी अनेक कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

या वेळी उत्तर रायगड सरचिटणीस दीपक बेहरे, रायगड विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, उत्तर रायगड जिल्हा किसान मोर्चाध्यक्ष अतुल बडगुजर, उपाध्यक्ष उत्तर रायगड सनी यादव, कर्जत मंडळाचे अध्यक्ष राजेश भगत, जि. प. माजी सदस्य, नरेश पाटील, फ्रेंड्स ऑफ बीजेपी व खालापूर विधानसभा संयोजक नितीन कांदळगावकर, युवा मोर्चा खालापूर अध्यक्ष नागेश पाटील, कर्जत–खालापूर युवा मोर्चा विधानसभा प्रमुख प्रसाद पाटील, खालापूर शहराध्यक्ष दीपक जगताप, सरचिटणीस आबासाहेब देशमुख, रायगड जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष जगदीश आगिवले, आतकरगावचे माजी सरपंच संदीप पाटील, भाजप महिला पदाधिकारी श्वेता मनवे, वत्सला मोरे, यशोदा मोरे, राखी गणेशकर, कर्जत विधानसभा विस्तारक हेमंत नांदे, खालापूर मंडळाचे सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी भाजप युवा वॉरिअर्स रायगड जिल्हा सहसंयोजक अभिषेक कदम व युवा वॉरिअर्स तालुका संयोजक अक्षय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली व खरसुंडी येथील कार्यकर्त्यांनी गोवा विधासभेचे आमदार संकल्प आमोनकर यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

वासरंग येथील साहिल भिसे, राज उतेकर, संकेत बारस्कर, अनिकेत बारस्कर, मंदार बारस्कर, सागर वाघमारे, कल्पेश पवार, प्रथमेश साळुंखे, सिद्धेश शिंदे सर्व खरसुंडी गाव तसेच स्वतेज बागराव, अतुल लांबे, रोहित गस्ती, निर्भय पवार, राजेश पाटील, सार्थक हिंदुराव, रुरूल नदाब, कुशल तेलवणे, अथर्व सुर्वे, सूरज बायस, दर्शन लांबे, रोहन भऊड, कुमार राठोड, चेतन गांभे कार्यकर्त्यांनी भाजपत जाहीर प्रवेश केला.

# ‘ग्रीन अँड ग्रीन इंडिया’तर्फे किनारपट्टीची स्वच्छता

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

ग्रीन अँड ग्रीन इंडिया इंटरनॅशनल या संस्थेच्या रायगड युनिटने शनिवारी (दि.२१) अलिबाग, किहीम, वरसोली आणि आवास या किनारपट्टीवर किमान १५ किमी अंतरावरील कचरा उचलून किनारपट्टी स्वच्छ केली.

सालाबादप्रमाणे शनिवारी जगभरात जागतिक किनारपट्टी स्वच्छता दिवस म्हणून साजरा केला गेला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष बिपुल हजारिका, मुख्य दिशादर्शक चारलिंग गोगाई,



महाराष्ट्र प्रमुख संतोष थोरात, संयोजक अतुल कोठारी, संतोष पूरव, सागर थोरात, राहुल जोशी, मल्हार थोरात, पायल आंब्रे, रत्नाकर घरत व स्वयंसेवक उपस्थित होते.

# पनवेलमध्ये कापसे पैठणीचे प्रदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

थेट विणकर ते ग्राहक विक्री अंतर्गत रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलतर्फे महिलावर्गासाठी पनवेलमध्ये प्रथमच येवला येथील कापसे पैठणीचे भव्य प्रदर्शन व विक्रीसाठी आयोजन करण्यात आले आहे.

गणपती मंदिर हॉल मिडल क्लास हौसिंग सोसायटी मैदानाजवळ २७ ते २९ सप्टेंबरदरम्यान सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत या भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन आमदार प्रशांत ठाकूर व वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे, तसेच या कार्यक्रमाचे सन्माननिय पाहुणे म्हणून कामगार नेते महेंद्र घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, डॉ.गिरीश गुणे, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष शैलेश पोटे, सचिव दिपा गडगे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष शैलेश पोटे यांनी केले आहे.

पान १ वरुन

## महिला पदाधिकाऱ्यांनी जबाबदारी यशस्वीपणे बजावावी –सुलक्षणा सावंत

या वेळी सुलक्षणा सावंत यांनी महिला पदाधिकाऱ्यांकडून कार्याचा आढावा घेतला तसेच त्यांना सहज आणि सोप्या शब्दात मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, महिला सर्व क्षेत्रात जबाबदारीने काम करत असतात, त्याचप्रमाणे राजकारणात महिला मोर्चाची ताकद मोठी आहे. तुम्हाला पक्षाने जबाबदारी दिली आहे ती तुमच्यामध्ये असलेल्या क्षमतेमुळे. ही ताकद विजयाचा झेंडा डौलाने फडकवणार आहे. सहा लाख ७४ हजार मतदार असलेला पनवेल हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा विधानसभा मतदारसंघ आहे. लोकसभा निवडणुकीत पनवेलने मताधिक्य मिळवून दिले आहे. त्या अनुषंगाने व्यवस्थितरीत्या आणि गाफील न राहता काम केल्यास जिल्ह्यातील तीनही ठिकाणी आपल्याला विजय मिळवता येईल.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, भाजप खोलवर रूजलेला पक्ष आहे. त्यामुळे पक्ष लोकहिताचे निर्णय घेऊन सक्षमपणे काम करत आहे आणि त्याच अनुषंगाने पक्ष संघटनेसाठी अपेक्षित असलेले काम महिला मोर्चाच्या वतीने होत आहे.

## महापुरुषांचा आदर्श घ्या –लोकनेते रामशेठ ठाकूर

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी उपस्थितांचे स्वागत व परिचय करून दिला तसेच प्रास्ताविकातून संस्थेच्या सर्वच महाविद्यालयांनी नेत्रदीपक प्रगती केल्याचे सांगितले. त्यांनी नवीन शैक्षणिक धोरणावरही विचार व्यक्त केले.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर सेवकवर्ग, विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर व डॉ. यशवंत उलवेकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर.ए. पाटील यांनी मानले.

# विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेच्या लाभार्थींना धनादेश वाटप

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ जिल्हा कार्यालय रायगड यांच्यामार्फत प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना राबविली जात आहे. या योजनेला एक वर्ष पूर्ण झाल्याने जिल्हा कार्यालय रायगड व स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने योजनेच्या लाभार्थींना कर्जाचे धनादेश वाटप व प्रशिक्षण प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून स्टेट बँक ऑफ इंडिया मुंबई डीजीएम श्रीनिवास, विभागीय अधिकारी पेण विलास शिंदे, महाव्यवस्थापक हरळय्या, बँक व्यवस्थापक आनंद, राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी डोलकर व ज्येष्ठ औद्योगिक पर्यवेक्षक बोंडरे उपस्थित होते.

# स्वच्छताकर्मींच्या आरोग्याला प्राधान्य

## पनवेलच्या चारही प्रभागांमध्ये तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या चारही प्रभागातील घनकचरा व्यवस्थापन विभागातील सर्व सफाई कर्मचारी तसेच त्यांच्या कुटूंबियांची प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.





स्वच्छ भारत अभियानाच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त केंद्रीय गृहनिर्माण व शहरी कार्य मंत्रालय आणि केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता ही सेवा मोहीम राबविण्यात येत आहे. स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता या संकल्पनेसह स्वच्छता ही सेवा मोहीमेस महापालिका कार्यक्षेत्रात चारही प्रभागात उत्साहात सुरूवात झाली आहे. या अंतर्गत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने आदरांजली म्हणून 'स्वच्छ भारत दिवस' साजरा केला जातो. स्वच्छ भारतासाठी स्वयं प्रेरणा व सामूहिक कृतीला बळकटी देण्यासाठी 'स्वच्छता ही सेवा' पंधरवडा साजरा आयोजित करण्यात आला आहे. या पंधरावड्यांतर्गत सखोल स्वच्छता मोहिमांबरोबरच 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' उपक्रम राबविला जात आहे. याअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागातील सर्व सफाई कर्मचारी तसेच त्यांच्या कुटूंबियांची प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन २३, २४, २५ सप्टेंबर रोजी प्रभाग निहाय नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये आयोजित करण्यात आले आहे.

या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये कर्मचाऱ्यांच्या जनरल तपासणी, धनुर्वाताचे इंजेक्शन, आवश्यकतेनूसार रक्त चाचण्या, इतर चाचण्या करण्यात येत आहेत तसेच आवश्यकतेनूसार तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येत आहे. या आरोग्य तपासणीमध्ये केवळ महापालिका कर्मचारीच नाही तर त्यांच्या कुटूंबियांची देखील आरोग्य तपासणी केली जात आहे. 'स्वच्छता हीच सेवा' या मोहिमेंतर्गत पालिका क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

नागरिकांनी स्वच्छता ही आपली जीवनपध्दती बनविण्यासाठी प्रतिज्ञा करून स्वच्छ भारत अभियानामध्ये सहभागी होण्याचे आवाहन घनकचरा व आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले आहे.





पनवेल : भाजप उलवे नोड १चे अध्यक्ष निलेश खारकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे गव्हाण विभागीय अध्यक्ष अमर म्हात्रे, उपाध्यक्ष शैलेश भगत, महिला मोर्चा अध्यक्ष निकिता खारकर, युवा मोर्चा अध्यक्ष वितेश म्हात्रे, सरचिटणीस मदन पाटील, कोषाध्यक्ष दीपक गोंधळी, अवधेश महतो, प्रिया अडसूळे, प्रिती चंदेल, सरचिटणीस अंकुश ठाकूर, तालुका चिटनीस रवींद्र शिंदे, अभिमन्यू दापोलकर, चिटणीस सुहास गोंधळी, नंदू ठाकूर, स्वप्नील म्हात्रे, अक्षय कोळी, उपाध्यक्ष प्रवीण ठाकूर, नामदेव ठाकूर, चिंटू गोंधळी, संतोष तुडमे, निलेश खोत, समाधान पाटील, अमित नाईक आदी उपस्थित होते.

# खारघरमध्ये सिग्नल यंत्रणा बसविण्याच्या कामाला सुरुवात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर १३ येथील डेली बाजार परिसरात सिग्नल यंत्रणा बसविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या यंत्रणेसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महापालिकेच्या नेत्रा पाटील यांनी पाठपुरावा व मागणी केली होती.

हावरे डेली बाजार सेक्टर १३ येथील सिग्नल यंत्रणा बसवण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. लवकरच तवा हॉटेल जंक्शन सेक्टर २१ येथेदेखील सिग्नल यंत्रणा कार्यान्वित होणार, असे पनवेल महापालिकेच्या वतीने लेखी पत्र देऊन नगरसेविका नेत्रा पाटील यांना कळविण्यात आलेले आहे.

कामाला सुरुवात करण्यात आली, या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, खारघर मंडल उपाध्यक्ष किरण पाटील, ज्येष्ठ नेते दिलीप जाधव, उद्योग आघाडी उत्तर रायगड जिल्हा संयोजक भरत कोंढाळकर, राधेश्याम शर्मा, गोपाल राणा, खारघर खान्देश विकास फाउंडेशन अध्यक्ष शिवाजी आबा पाटील, युवा मोर्चा सचिव दीपक ठाकूर, प्रेम कुमार सोनी आदी उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांसाठी बेस्ट आऊट ऑफ वेस्ट स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.२४) व्यवसाय व्यवस्थापन व शिक्षण विभाग व व्यवस्थापन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने बेस्ट आऊट ऑफ वेस्ट या स्पर्धेचे आयोजन केले होते.

या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनवल्या व त्यांच्या कौशल्यांचे सादरीकरण केले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. राजश्री म्हात्रे व प्रा. मनोज यादव यांनी भूमिका बजावली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी स्पर्धकांचे तसेच विजेत्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

आयोजन प्रा. डॉ. रीत ठुले यांनी केले तसेच प्रा. रेवन शिंदे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. शगुफत्ता शान, प्रा. अर्पिता नाहक, प्रा. स्नेहा नाईक, प्रा. शिवानी मानकामे व व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.





पनवेल : तालुक्यातील आकुर्ली ग्रामस्थ मंडळाच्या सार्वजनिक गौरा गणपतीचे आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल उत्तर जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, सचिन पाटील आदी उपस्थित होते.









पनवेल : विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात सुमारे एक कोटी ३० लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ मंगळवारी झाला. या कामांचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. सर्व कामे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विविध निधींमधून होणार आहेत. भूमिपूजनावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.















संपादकीय

# विरोधकांचा दुटप्पीपणा

बदलापूरमधील दोन चिमुरड्या मुलींवर शाळेत लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली तेव्हा तेथील रेल्वेस्थानकात स्थानिकांकडून उग्र आंदोलन करण्यात आले होते. तेव्हा या प्रकरणीच्या आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी राज्यातील विरोधक करत होते. आता तेच विरोधक, या प्रकरणीचा आरोपी अक्षय शिंदे याचा पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या गोळीबारात मृत्यू झाल्यावर मात्र आकांडतांडव करीत आहेत. या दुटप्पीपणाला काय म्हणावे?

**बदलापूर येथील नामांकित शाळेतील दोन चिमुरड्या विद्यार्थिनींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा सोमवारी सायंकाळी पोलिसांशी झालेल्या चकमकीत मृत्यू झाला. आरोपी अक्षय शिंदे याने पोलिसांवर गोळीबार केला त्यामुळे पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ त्याच्यावर गोळी झाडली, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिली. आरोपीच्या पूर्वपत्नीने लैंगिक अत्याचाराची तक्रार केली होती. या प्रकरणाच्या चौकशीसाठी वॉरण्ट घेऊन त्याला सायंकाळी चौकशीसाठी ठाण्याला नेण्यात येत होते. पोलिसांची गाडी मुंब्रा बाह्यवळण मार्गावर आल्यानंतर आरोपीने आधी पोलिसांची बंदूक हिसकावून घेत पोलिसांवर गोळीबाराचा प्रयत्न केला. त्याने तीन गोळ्या झाडल्याचे सांगितले जाते. यात एक पोलीस अधिकारी जखमी झाला. त्यानंतर पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ आरोपीवर गोळीबार केला. जखमी आरोपीला हॉस्पिटलमध्ये नेले असता त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित करण्यात आले. बदलापूर येथील शाळेतील पूर्वप्राथमिक वर्गातील दोन बालिकांवर शाळेच्या स्वच्छतागृहात १२ ऑगस्ट रोजी लैंगिक अत्याचार करण्यात आले. हे प्रकरण उजेडात आल्यानंतर शाळेतील सफाई कर्मचारी अक्षय शिंदेला अटक करण्यात आली. राज्यातील युती सरकारने वेगवान तपासासाठी एसआयटी नेमली. या पथकाने तपास करून अक्षयवर आरोपपत्रही दाखल केले होते. त्याआधारे लवकरच त्याला शिक्षा होणे अपेक्षित होते, परंतु त्याआधीच सोमवारी चकमकीत तो ठार झाला. अक्षयच्या मृत्यूनंतर एकीकडे विरोधक आक्रमक झाले व सरकारला त्याच्या एन्काऊंटरबद्दल जाब विचारू लागले तर दुसरीकडे ज्या बदलापूरमध्ये या प्रकरणावरून जनक्षोभ उसळला होता, तेथे मात्र जनतेत अक्षयच्या मृत्यूच्या बातमीने आनंदाचे वातावरण दिसून आले. 'एक्स' (म्हणजे आधीचे ट्विटर) या समाजमाध्यमावरही 'देवाचान्याय' हा हॅशटॅग मंगळवारी क्रमांक एकवर ट्रेंडिंग होता, परंतु विरोधक मात्र पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या कारवाईवरून राजकारण पेटवण्यातच व्यस्त राहिले. आरोपी अक्षय शिंदेला तळोजा कारागृहातून अन्यत्र नेताना पोलिसांनी हलगर्जीपणा दाखवल्याचा आरोप करण्याबरोबरच, या घटनेमुळे अनेक प्रश्न निर्माण झाल्याचा कांगावा आता विरोधक करीत आहेत. चकमकीच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सरकारकडून तातडीने आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या उपायुक्तांची नेमणूक करण्यात आली आहे. तरीही, उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींमार्फत या प्रकरणाची चौकशी व्हावी, अशी मागणी आता विरोधक करत आहेत. अक्षय शिंदेने जे नीच कृत्य केले होते, त्याबद्दल त्याला भरचौकात हाल-हाल करून मारले जायला हवे होते, तरच अशा मनोवृत्तींवर वचक निर्माण होईल अशी सर्वसाधारण जनभावना या प्रकरणासंदर्भात दिसत असताना, पोलिसांच्या मागे ठामपणाने उभे राहण्याऐवजी विरोधक मात्र पोलिसांच्या कारवाईबद्दलच प्रश्न उपस्थित करीत आहेत याला काय म्हणावे? या अशा संवेदनशील प्रकरणात तरी विरोधी नेत्यांनी सद्सद्विवेक बुद्धी वापरून बेताल वक्तव्ये टाळायला हवी होती, परंतु काही विरोधी नेत्यांकडून आता तशी अपेक्षाच करता येणार नाही हे पुन्हा दिसून आले आहे.**

# चिरनेर येथील शौर्यशाली जंगल सत्याग्रह





खबरबात
जीवन केणी

उरण तालुक्यातील चिरनेर येथे २५ सप्टेंबर १९३० रोजी झालेल्या शौर्यशाली व गौरवशाली चिरनेर जंगल सत्याग्रहाला ९४ वर्षे पूर्ण होत आहेत. देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढा उभारून जंगल सत्याग्रह केला. शूरवीर जुलमी इंग्रज सत्तेविरुद्ध लढण्यासाठी आक्कदेवीच्या माळरानावर कोयते, कुऱ्हाडी घेऊन या जुलमी सत्तेतील सत्ताधाऱ्यांशी लढण्यासाठी मनाशी निश्चय करून गावोगावी प्रभात फेऱ्या काढू लागले.

साऱ्या गावांतील ग्रामस्थांना आंदोलनात सहभागी करून घेतले. अशा या देशाभिमान मनाशी बाळगून असलेल्या शूरवीरांनी अतिशय आक्रमक्तेने अहिंसात्मक सत्याग्रह केला. २५ सप्टेंबर १९३० रोजी झालेल्या चिरनेर जंगलसत्याग्रह हा इंग्रज सरकारने केलेल्या जुलमी जंगलतोड कायद्या विरुद्ध करण्यात आलेले सशत्र आंदोलन आहे. त्याचप्रमाणे गुरे चरण्यासाठी, लाकूड फाट्यासाठी व शेतीच्या राबासाठी लागणारा झाडपाला अशा उपयोगासाठी या डोंगराचा वापर करण्यात येत होता. यासाठी इंग्रज सरकारने बंदी घातली होती. त्यामुळे सर्वत्र खवळलेले वातावरण पसरू लागले होते. त्यावेळी एका वटवृक्षाच्या सावली खाली हजारो सत्याग्रही एकत्र येऊन सत्याग्रह करण्याच्या ठिकाणी डोंगर चढू लागले. त्यांच्या मागे इन्स्पेक्टर व पोलीस शिपाई होते. आम्ही झाडे तोडली आम्हाला अटक करा. तेथे पोलिसांनी कारवाईची धडपकड सुरू केली. पोलिसांना या वेळी बेड्याही इतर कमी पडल्या. इतर सत्याग्रहिवर लाठीमार सुरू केला. मध्येच इन्स्पेक्टर खवळला. सत्याग्रहींना शिवीगाळ करू लागला. अखेर सत्याग्रहिनी एकत्र होऊन इन्स्पेक्टरला घेरावा घातला. त्यावेळी त्याला भिती वाटली.

हे मामलेदारांना कळताच डोंगर चढून गेले व त्या जागी पोहोचून त्यांनी पोलीस इन्स्पेक्टरची सुटका केली. त्यानंतर सत्याग्रहींच्या पाठीमागून पोलीस इन्स्पेक्टर डोंगराच्या पायथ्याशी येऊन पोहोचले आणि मोकळ्या जागी आक्कादेवीच्या माळरानावर पोलिसांना गोळीबाराचा आदेश देण्यात आला.

नियोजनानुसार पोलिसांनी अमानुष गोळीबार केला आणि पुढे काय? तर क्षणातच १२ सत्याग्रही रक्ताच्या थारोळ्यात पडले. अनेकजण जखमी झाले.कोणत्याही परिस्थितीची तमा न बाळगता लष्करासारखी दहशत माजवून सत्याग्रहींना कूट नितीने धडपकड करुन चिरनेरच्या जंगलाचा आश्रय घेतला. शेवटी ४७ आरोपीना अटक करण्यात आली. त्याच्यावर खटला दाखल करण्यात आला. अटक



करण्यात आलेल्या ४७ सत्याग्रहींना फाशीची शिक्षा होणार, अशा प्रकारे खटल्याची तयारी करण्यात आली, परंतु या जुलमी सत्तेतील पोलिसांना एकही माफिचा साक्षीदार मिळाला नाही. सर्वजण एकमताने ठाम निर्णय घेऊन राहिले.

ठाणे येथील जिल्हा सत्र न्यायालयात खटला उभारण्यात आला. त्यावेळी ४७ आरोपी पैकी फक्त पाच आरोपींना जास्तीत जास्त पाच वर्षांची शिक्षा देण्यात आली. बाकी सर्व सत्याग्रही आरोपीना निर्दोष मुक्त करण्यात आले. या वेळी बचावासाठी कायदेतज्ज्ञ बाबासाहेब करंदीकर यांच्यामार्फत काम करण्यात आले. न्यायाधीशानीही मानवतावादी दृष्टिकोनातून काम केल्याने गांधी आर्यवीन कराचा लाभ सत्याग्रहींना मिळाला. चिरनेर परिसरातील त्यावेळचे भूमिपुत्र लढवय्ये होते. कोणत्याही प्रकारे स्वतःच्या जीवाची पर्वा न करता व जुलमी इंग्रज सत्तेपुढे पायघड्या न घालता हा जंगल सत्याग्रह केला. या सत्याग्रहामध्ये धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी (दोघेही चिरनेर), आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे), आनंदा माया पाटील (धाकटी जुई), रामा बामा कोळी (मोठी जुई), मोरेश्वर रघुनाथ शिंदे (न्हावी, कोप्रोली), परशुराम रामा पाटील (पाणदिवे) व हसुराम बुधाजी घरत (खोपटे) हे आठ शूरवीर हुतात्मे झाले. त्यांची हुतात्मा स्मारके चिरनेरसह याविभागातील वरील नमूद सात ठिकाणी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले यांच्या कार्यकाळात बांधण्यात आली.

या हुतात्मा स्मारकांना शासनाच्या वतीने दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करूनही एक-दोन स्मारके वगळता बहुतांशी स्मारकांची दैवस्था झाल्याचे चित्र दिसत आहे. काही ठिकाणी तर दारू जुगारांचे अड्डे त्याच प्रमाणे स्वच्छतेचा अभाव दिसून येत आहे. चिरनेर येथे २५ सप्टेंबरच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्री, खासदार, आमदार, नेतेमंडळी येतात. चिरनेर हे जंगलसत्याग्रहींचे गाव आहे. या गावाला पर्यटन स्थळाचा दर्जा मिळावा यासाठी अनेकांनी आश्वासने दिली.

चिरनेर येथील दिवंगत ज्येष्ठ कार्यकर्ते यशवंत बाबू नारंगीकर यांनी चिरनेर पर्यटन स्थळ व्हावे, या मागणीसाठी राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला, आज तागायत ज्या ठिकाणी देशाच्या स्वातंत्र्यासाठी जंगल सत्याग्रह झाला त्याठिकाणी २५ सप्टेंबरचा पूर्ण कार्यक्रम व्हावा यासाठी त्याठिकाणी जाण्याचा रस्ता योग्यतेने बनविण्याची मागणी होत आहे.

चिरनेर येथे सत्याग्रहासह पेशवेकालीन स्वयंभू अशा महागणपतीचे स्थान आहे. त्यातील गणपतीची मूर्ती बाजूला साजेसे तलाव याशिवाय गावाच्या पूर्वेला लाभलेला डोंगराचा नैसर्गिक भाग, जंगल सत्याग्रहा च्या ठिकाणी लहानसे आक्कादेवी धरण आणि त्या ठिकाणी आणखी असलेल्या उणीवांची भर केल्यास चिरनेर पर्यटन स्थळ व्हायला फारसा अवधी लागणार नाही, असे मात येथील जाणकार व्यक्त करीत आहेत.


चिरनेर जंगल सत्याग्रहात , ज्या शूर विरांचे रक्त सांडले,ज्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या संसारावर तुळशीपत्र वाहून आपल्या प्राणांची आहुती दिली, ज्यांच्या स्मुतीस पोलिसांच्या शासकीय सलामीने बंदूकीच्या प्रत्येकी तीन फैरी झाडून मानवंदना दिली जाते.



## बदलते तंत्रज्ञान

## आता आयफोन तुमच्या डोळ्यांच्या इशाऱ्यावर

ॲपल आयफोन वापरकर्त्यांना लवकरच एक फीचर मिळणार आहे, यामुळे तुमचा फोन वापरण्याचा अनुभव बदलेल. आतापर्यंत तुम्ही फोन ऑपरेट करण्यासाठी तुमची बोटे वापरता, पण iOS १८ अपडेट रोल आउट झाल्यानंतर तुम्ही फक्त तुमच्या डोळ्यांच्या हावभावाने फोन ऑपरेट करता येणार आहे.



कंपनीने आपल्या नवीन ऑपरेटिंग सिस्टममध्ये आय ट्रॅकिंग फीचरचा समावेश केले आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही फक्त डोळ्यांनी फोन कंट्रोल करू शकाल.

ॲपलचे हे नवीन फिचर सध्या iOS १८ डेव्हलपर बीटामध्ये उपलब्ध आहे, पण कंपनी लवकरच iOS १८ चे व्हर्जन जारी करेल. अहवालानुसार, कंपनी पुढील महिन्यात म्हणजेच ऑक्टोबरमध्ये या ऑपरेटिंग सिस्टमचे स्थिर अपडेट यूजर्ससाठी जारी करू शकते.

कंपनीचे म्हणणे आहे की, फीचरसाठी कोणत्याही नवीन हार्डवेअरची आवश्यकता नाही, हे फीचर फोनमध्ये देण्यात आलेल्या फेस आयडी कॅमेरा फिचरवरच काम करेल.

हे फिचर सेट करण्यापूर्वी, तुमच्या फेस आयडीची कॅमेरा लेन्स क्लिन आणि तुम्ही जिथे आहात तिथे पुरेसा प्रकाश हवा. हा कॅमेरा तुमच्या डोळ्यांच्या हालचालींचा मागोवा घेईल.

हे फीचर वापरण्यासाठी पहिल्यांदा तुम्हाला तुमच्या ळझहेपश किंवा iPadच्या सेटिंगमध्ये जावे लागेल. सेटिंग्जमध्ये गेल्यानंतर, Accessibilityमध्ये जावे लागेल. यात तुम्हाला फिजीकल अँड मोटर सेक्शनमध्ये जावे लागेल, यात तुम्हाला आय ट्रॅकिंग फिचर मिळेल, तुम्ही येथून हे फिचर चालू करू शकता.

यानंतर, तुम्हाला स्क्रीनवर ॲपलकडून काही सूचना मिळतील, त्या तुम्हाला फॉलो कराव्या लागणार आहेत. तुम्हाला स्क्रीनवर काही डॉट दिसतील. तुम्हाला त्या डॉटवर लक्ष केंद्रित करून या स्टेप पूर्ण करावी लागेल. प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, तुम्ही तुमच्या आयफोनमध्ये हे फिचर वापरण्यास सक्षम असाल.

दरम्यान, ॲपल कंपनी आयफोन युजर्ससाठी नवनवे फिचर आणत असते. त्याला चांगला प्रतिसादही मिळतो.

# प्रतिभावान कवी अरुण कोलटकर



निमित्त

अरुण बालकृष्ण कोलटकर हे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांत कविता करणारे भारतीय कवी होते. कोलटकरांचा आज स्मृतीदिन आहे. त्यांचा जन्म १ नोव्हेंबर १९३२ रोजी कोल्हापुरात झाला. त्यांचे शालेय शिक्षण तेथील राजाराम माध्यमिक विद्यालयात झाले. मुंबईच्या सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सचे पदवीधारक असलेले कोलटकर एक उत्तम ग्राफिक्स डिझायनर व जाहिरात क्षेत्रातील अत्यंत यशस्वी कलादिग्दर्शक होते. १९५०-१९६० च्या दशकांत त्यानी लिहिलेल्या कविता या मुंबईतील विशिष्ट बोली मराठीतल्या असून त्यात मुंबईत आलेल्या निर्वासितांच्या व गुन्हेगारांच्या जीवनाचे दर्शन घडते.

मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांत १९५५ पासून कविता लिहिणार्या अरुण कोलटकरांची २००२ पर्यंत, म्हणजे सत्तेचाळीस वर्षांत 'जेजुरी' (१९७६) आणि 'अरुण कोलटकरच्या कविता' (१९७७) अशी अवघी दोन पुस्तकं प्रकाशित झाली होती. मात्र, कोलटकर गेले त्या एकाच वर्षात, २००४ मध्ये, त्यांची पाच पुस्तकं आली. मराठीत 'भिजकी वही' आणि 'द्रोण', इंग्रजीमध्ये 'काला घोडा पोएम्स' आणि 'सर्प सत्र', 'द पोलीसमन : अ वर्डलेस प्ले इन थर्टिन सीन्स' या पुस्तकाच्या रूपाने कोलटकरांची रेखाचित्रकार म्हणून नवी ओळख झाली. २००५ मध्ये 'न्यूयॉर्क रिव्ह्यू ऑफ बुक्स'च्या अभिजात पुस्तकांच्या मालेत कोलटकरांच्या 'जेजुरी'ची आंतरराष्ट्रीय आवृत्ती प्रसिद्ध झाली. त्याच्या पुढल्या वर्षी 'अरुण कोलटकरांच्या चार कविता' हे मराठी कवितांचं छोटं पुस्तक आलं. २००९ मध्ये प्रासनेच 'बोटराईड अॅन्ड अदर पोएम्स' हा इंग्रजी कवितांचा संग्रह काढला. २०१० मध्ये इंग्लंडमधल्या ब्लडॅक्स बुक्सने कोलटकरांचं सुमारे पावणेचारशे पानांचं 'कलेक्टेड पोएम्स इन इंग्लिश' प्रसिद्ध केलं. त्यात मराठी कवितांच्या अनुवादांसोबतच त्यांनी संतांच्या कवितांचे केलेले अनुवादही समाविष्ट आहेत आणि २०११ मध्ये प्रासने कोलटकरांच्या दफ्तरात सापडलेला 'जेजुरी'चा मराठी खर्डा पुस्तकरूपाने प्रकाशित केला.

कोलटकरांची कविता ही सगळ्या मराठी समीक्षेला, रसिकतेला, आस्वादकतेला आव्हान देत समोर उभी राहते आणि तेही, हा आव्हानाचा आवेश मुळीच न पांघरता. चांगली प्रतिमांकित भावकविता वाचताना वाचक कवितेतील भावप्रतिमांच्या मनावर उमटणार्या ठशांतून कवितेच्या अर्थाची संगती लावण्याचा प्रयत्न करतो. कवितेत एका थंड, अलिप्त शैलीत त्या वास्तवाचं कथन सुरू राहातं. कोलटकरांनी ज्या काही थोड्याथोडक्या मराठी कविता लिहिल्या, त्यातल्या फारतर पंचवीस-तीस या सामान्य काव्यरसिकांच्या आकलनकक्षेच्या परीघावर राहून शक्य वाटणारं आव्हान देत राहतात. बाकी बहुतांशी अनाकलनीयच; पण त्यांच्या कवितेने एकूण मराठी कवितेला अभिव्यक्तीची एक कोरी करकरीत वाट दाखवली. नजरही पोचू नये अशी ही वाट; पण कोलटकरांच्या प्रतिभेचा अश्व तिथे दिमाखाने वावरला.

एका प्रभावी प्रसिद्धीमाध्यमाच्या क्षेत्रात यशस्वी व्यावसायिक म्हणून वावरणारा हा हाडाचा कवी आपली अस्सल कलावंताची नैसर्गिक आत्मरत वृत्ती जपत, सतत स्वतःचा आणि आपल्या कवितेच्या वाटेचा शोध घेत राहिला. अशा या प्रतिभावान कवीचे २५ सप्टेंबर २००४ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : कोळीवाडा समुद्रकिनारी कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे येथे अतिशय दुर्गंधी सुटल्याने पालिकेने स्वच्छता व कचरा नियोजन करण्याची गरज आहे. हे पर्यटक येण्या-जाण्याचे ठिकाण असल्याने स्वच्छता असणे गरजेचे आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

## छातीत जळजळ होण्यामागे 'हे' असू शकते कारण

चांगल्या पाचन क्रियेमुळे प्रकृती तंदुरुस्त राहते. खराब पाचन क्रियेमुळे संपूर्ण आरोग्यावर वाईट परिणाम होतो. ज्यावेळी खाणं व्यवस्थित पचत नाही, त्यावेळी पोषक तत्व सुद्धा शरीराला पूर्णपणे मिळत नाहीत. खराब पाचनक्रियामुळे आरोग्यासंबंधी अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. काही लोकांना सतत एसिडिटी होत असते. त्यामुळे आंबट ढेकर, छातीत जळजळ अशा समस्या निर्माण होतात. जर, नेहमीच असा त्रास होत असेल, तर काही गोष्टींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.



पोटात आधीपासून एसिड असतं. खाण पचवण्यात हे एसिड मदत करतं. पण काही चुकांमुळे शरीरातील एसिडच प्रमाण वाढतं. त्यामुळे छातीत जळजळ, आंबट ढेकर येऊ लागतात. काहीवेळा औषधांच सेवन आणि प्रेग्नेंसीमुळे सुद्धा एसिडिटी होऊ शकते. जर एसिडिटी सतत होत असेल, तर यामागे काय कॉमन कारण आहे ते जाणून घ्या.

**ॲसिडिटी का चाळवते?**

जे काही आपण खातो ते पचवण्यासाठी फिजिकल एक्टिविटी आवश्यक आहे. जर जेवल्यानंतर तुम्हाला बसून राहण्याची किंवा झोपून जाण्याची सवय असेल, तर त्यामुळे सुद्धा एसिडिटी चाळवू शकते.

**रात्री जेवल्यानंतर काय टाळलं पाहिजे?**

जेवल्यानंतर तुम्ही लगेच चहा-कॉफी पीत असाल, तर एसिड रिफलेक्सची समस्या निर्माण होऊ शकते. खासकरुन रात्री जेवल्यानंतर चहा-पाणी पिणं टाळा. अन्यथा अडचण येऊ शकते.

**एसिड रिफलक्स**

रात्री एसिड रिफलक्स होण्यामागे दोन कारणं असू शकतात. एक उशिरा जेवण त्यानंतर लगेच झोपणं. दुसरं चुकीच्या पोजीशनमध्ये झोपणं. रात्री पोटावर झोपल्यास एसिड रिफलक्सचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे छातीत जळजळ होऊ शकते.

**का ॲसिडिटी वाढते?**

खाण्यापिण्याच्या सवयी बदलल्या आहेत. त्याचा थेट परिणाम पचनावर होतो. जास्त जंक फूड, मसालेदार तळलेलं खाणं, जास्त चहा-कॉफीच सेवन अशा गोष्टींमुळे सुद्धा एसिडिटी वाढते.

# खोपोलीत विजांच्या कडकडाटासह पाऊस

## भातपिकाचे नुकसान होण्याची भीती

**खोपोली : प्रतिनिधी**

मागील एक आठवडा पावसाने उसंती घेतली होती. दरम्यान मंगळवारी (दि.२४) पहाटे ३ वा.पासून दोन तास प्रचंड विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस कोसळला.

असाच मुसळधार पाऊस कायम राहिल्यास तयार झालेल्या भातपिकाची नासाडी होण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतात भातपिक तयार होत आहे. अनेक ठिकाणी भातकापणीचे नियोजन केले जात आहे, मात्र शेवटच्या टप्प्यात पावसाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास जाणार की, काय अशी स्थिती निर्माण झाली आहे.



शेतात मोठ्या प्रमाणावर पाणी भरत असल्याने व भातपिक आडवे झाल्याने कोंब फुटण्याची स्थिती निर्माण झाली आहे. असाच पाऊस सुरू राहिल्यास भातपिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची भीतीने शेतकरी चिंतेत सापडला आहे.

**भातपिक कापणीसाठी मजूर व अन्य जुळवाजुळव सुरू असतानाच मंगळवारी पडलेल्या मुसळधार पावसामुळे तयार भातपिकाचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.**
**–दत्तात्रय दिसले, शेतकरी, केळवली**

# कर्जत तालुक्यातील वर्णे येथील कार्यकर्ते शिवसेनेत

**कर्जत : प्रतिनिधी**

पळसदरी ग्रामपंचायत हद्दीमधील वर्णे गावातील कार्यकर्त्यांनी कर्जत येथे आमदार महेंद्र थोरवे यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये शिवसेनेत प्रवेश केला.

ज्येष्ठ कार्यकर्ते नंदकुमार देशमुख, दशरथ दरेकर, मनोहर देशमुख, प्रदीप देशमुख, स्वप्नील देशमुख, प्रभाकर देशमुख, शेखर देशमुख, गणेश देशमुख आदींसह इतर कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.



आमदार महेंद्र थोरवे यांनी, आपण आज पक्षप्रवेश करीत आहात. आपली सर्व कामे मार्गी लावले जातील. पळसदरी ग्रामपंचायत हा शिवसेनेचाच बालेकिल्ला आहे व भविष्यातदेखील आपल्या सर्वांच्या एकजुटीने तो आपल्याच ताब्यात राहिल, असा विश्वास व्यक्त केला. या वेळी शिवसेना उत्तर रायगड जिल्हाप्रमुख संतोष भोईर, तालुकाप्रमुख संभाजी जगताप, उपतालुका प्रमुख प्रदीप सुर्वे, माजी उपसरपंच देशमुख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.


## खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड पिनकोड नं. ४१०२०३
फोन नं. (०२१९२) २६६२२२, २६३३५६, २६४२११

जा.क्र. केएमसी/इएसटी/जीईए/वाचनालय /१३१३ दि. २४/०९/२०२४

**निविदा सुचना २०२४–२०२५**

खोपोली नगरपरिषद संचालित, कै. र. वा. दिघे वाचनालयास सन २०२४–२५ या आर्थिक वर्षामध्ये, खालील कामासाठी नोंदणीकृत, मान्यताप्राप्त कंपनीकडून/संस्थेकडून, अधिकृत पुरवठा धारकाकडून द्विलिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फी | निविदेसोबत भरवयाची आनामत रक्कम | निविदा बाबत माहिती मिळण्याचा विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | खोपोली नगरपरिषद संचालित,कै. र.वा. दिघे वाचनालयास दिवाळी अंक पुरविणे. | १००/– | १०००/– | वाचनालय विभाग |

सही/–
( गौतम भगळे)
उपमुख्याधिकारी
खोपोली नगरपरिषद

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग माणगाव

**ई-निविदा सुचना क्र. ५ सन २०२४-२५ (दुसरी मागणी)**

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग, माणगाव यांचेकडून खालील कामाकरिता ई–निविदा सुचना मागविण्यात येत आहे आंबोली नांदगाव प्रादेशीक पाणी पुरवठा योजना ता. मुरुड जि. रायगड– पंपिग मशिनरीसाठी तरंगता तराफा उभारणी करणे कामाबाबत. कामाची अंदाजित किंमत रु. १,१४,३९,६००/–

कामासंबंधीचा सविस्तर तपशील दि. २६/०९/२०२४ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक : १८/०९/२०२४

सही/–
(एच. आर. नागदे)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग माणगाव

## माणगांव नगरपंचायत, माणगांव

ता. माणगांव, जि. रायगड, पिनकोड ४०२१०४
Email- nagarpanchayatmangaon@gmail.com. फोन नं. ०२१४०२६३०५६

**जाहीर सुचना**

याव्दारे माणगांव नगरपंचायत कार्यक्षेत्रातील नागरीकांना कळवण्यात येते की, मा सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२१५/२००५ मधील संकीर्ण आवेदन (Misc-Application) क्र.१६९९/२०१९ च्या संदर्भात दिलेल्या निकालातील मार्गदर्शक सूचना व मा. उच्च न्यायालय मुंबई मधील दाखल याचिका क्र.३/२०२४ च्या अनुषंगाने प्राप्त आदेशान्वये माणगांव नगरपंचायत क्षेत्रातील Advance Medical Directive चे "Custodian" म्हणून श्री. प्रमोद पांडुरंग मोरे, स्वच्छता निरीक्षक, माणगांव नगरपंचायत (मो.नं. ९७६७२४४४२३/कार्यालयीन क्रमांक ०२१४०–२६३०५६) यांची नेमणूक दिनांक ०३/०९/२०२४ पासून पुढील आदेशापर्यत करण्यात आली आहे. तरी सर्व नागरीकांनी याची नोंद घ्यावी

जा.क्र./मानप/स्वच्छता /११४६/२०२४–२०२५
दिनांक २४/०९/२०२४

सही/–
संतोष माळी
मुख्याधिकारी
माणगांव नगरपंचायत

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान**

**''जाहीर आवाहन''**

**पनवेल महानगरपालिका– नगर पथविक्रेता समिती घटित करणेकरीता इतर मंडळ/ संघ प्रतिनिधींची निवड करणेबाबत इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत.**

या जाहीर आवाहनाद्वारे पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना कळविण्यात येते की, केंद्र शासनाकडील पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ चे मधील कलम ३६ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाने राजपत्र असाधारण भाग ४–अ. दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी पथविक्रेत्यांबाबत करावयाच्या कार्यवाहीकरिताचे नियम व आदेश शासन राजपत्राद्वारे प्रसिद्ध करण्यात आले आहे. शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम ११ (भाग–२–ख) अन्वयं पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समितीवर नामनिर्देशनासाठी विविध मंडळ/ संघ यांचेकडील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज मागवून प्रतिनिधींची निवड करणेकरिता प्रसिद्ध करणेबाबत आदेशित केले आहे.

सदर आदेशान्वये (१) व्यापारी संघ (१ सदस्य), यांचेकडील प्रतिनिधीची निवड करण्यात येईल. सदर संघाकडील इच्छुक व्यक्तीकडून अर्ज मागवून शासनाच्या सदर नियम व आदेशातील प्रकरण ४ मधील कलम १२ अन्वये खालील नमूद केलेल्या किमान अर्हता निकषाच्या आधारावर सदर संघाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्याचे नामनिर्देशन करण्यात येईल.

१. संघटनेची किंवा संघाची क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२. संघटना किंवा संघ मागील तीन वर्षांचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.
३. संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
४. संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिद्धदोषी असणार नाहीत.
५. संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा.

जाहीर आवाहन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत (दि.०९/१०/२०२४ अखेरपर्यंत) कार्यालयीन वेळी व दिवशी नमुद संघाकडील इच्छुक व्यक्तीनी नामनिर्देशन अर्ज आवक–जावक विभागास सादर करावेत. तदनंतर पनवेल महानगरपालिका नगर पथविक्रेता समिती सदस्य नेमणूकीकरीता संघातील इच्छुक व्यक्तींकडून अर्ज केलेल्या अंतिम उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. सदर अंतिम यादी झाल्यानंतर महानगरपालिकेकडून शासनाच्या आदेशानुसार नगर पथविक्रेता समिती गठीत करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. तरी. इच्छुक व्यक्तींनी विहित वेळेमध्ये आपले अर्ज सादर करावेत. असे आवाहन पनवेल महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

टिप : नामनिर्देशन पत्र हे महानगरपालिकेच्या डे–एन.यु.एल.एम. विभागाकडून प्राप्त करुन घेणेचे आहेत.

सही/–
(बाबासाहेब राजळे )
उप आयुक्त तथा,
शहर प्रकल्प अधिकारी
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. ४७१/४७३/२०२४
दिनांक २४/०९/२०२४

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

**शिक्षण विभाग, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय,**
**आगरी समाज हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल – ४१० २०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
Email : msbpanvel1993@gmail.com Email : panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. ४६९/४७१/२०२४ दि. २४/०९/२०२४

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेच्या शाळांमध्ये प्राथमिक शाळांतील इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांना एलिमेंटरी इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेसाठी चित्रकला किट उपलब्ध करून द्यावयाचे आहेत. याकामी इच्छुकांनी निविदा दर दि.०३/१०/२०२४ रोजी सायं. ३.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे सादर करावीत. सदर कामाकरीता अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३,५२,३५०/– आहे. सदर चित्रकला किटमध्ये आवश्यकबाबी खालीलप्रमाणे आहेत. दिनांकानंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.

| अ.क्र. | साहित्य | तपशील | संख्या |
|---|---|---|---|
| १ | चित्रकला वही | जंबो आकार | १ (१६ पृष्ठे) |
| २ | टीके पेपर | A३ | १० |
| ३ | ट्रेसिंग पेपर | A४ | ४ |
| ४ | पेन्सिल | HB | २ |
| ५ | पेन्सिल | ६B | २ |
| ६ | खोडरबर | - | २ |
| ७ | शार्पनर | - | २ |
| ८ | कंपास (Compass) | - | १ |
| ९ | कोनमापक(Protractor) | - | १ |
| १० | स्केल | १२ इंच | १ |
| ११ | स्केच पेन | काळा रंग | २ |
| १२ | पोस्टर रंग | १२ रंग | १ |
| १३ | प्लास्टिक क्रेयॉन | २४ रंग | १ |
| १४ | रंगीत पेन्सिल | १२ रंग | १ |
| १५ | वॉटर कलर केक | १२ रंग | १ |
| १६ | रंग पॅलेट | मध्यम आकार | १ |
| १७ | गोल ब्रश | ६ क्र | १ |
| १८ | गोल ब्रश | १ क्र | १ |
| १९ | गोल ब्रश | १२ क्र | १ |
| २० | सपाट ब्रश | ९ क्र | १ |
| २१ | कापूस चिंधी | ८ x ८ इंच | १ |
| २२ | क्लच पेन्सिल | – | १ |
| २३ | ब्रश धुण्यासाठी कंटेनर | लहान | २ |
| २४ | सुबोध चित्रकला पुस्तक | – | १ |

**या कामी अटी व शर्ती खालीलप्रमाणे :–**

१. संस्था नोंदणी सर्टिफिकेट,
२. पॅनकार्ड (संस्थेचे नावाने अथवा मालकाचे नावाचे)
३. जाहीर निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीधारक यांना राहतील.
४. नमुद केलेले दर हे सर्व प्रकारचे कर व वाहतूक खर्चासह समाविष्ठ असावेत.
५. कार्यादेश दिल्यानंतर संबंधित संस्थेने सर्व कामे वेळेत व मुदतीत महानगरपालिका हद्दीतील नेमून दिलेल्या ठिकाणी करणे आवश्यक आहे.
६. कामाचा कालावधी ३० दिवसांचा असेल.
७. वरील प्रस्तावित कामांचे काम निहाय स्वतंत्र भावपत्रक / कोटेशन विहित वेळेवर सादर करावे.
८. प्राप्त भावपत्रके स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांना राहतील.

सही/–
डॉ. प्रशांत रसाळ
अतिरीक्त आयुक्त– ।
पनवेल महानगरपालिका

## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र. ४६७/४६९/२०२४ दि. २३/०९/२०२४

**नागरिकांना जाहिर आवाहन**

पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पनवेल शहराला होणारा पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील होणारा पाणीपुरवठा गुरूवार दि. २६/०९/२०२४ सकाळी ९.०० ते शुक्रवार दि. २७/०९/२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. त्यामुळे शहरामध्ये सदर दिवशी खालीलप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

अ) गुरूवार दि. २६/०९/२०२४ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल.

१) हरिओमनगर उंच जलकुंभ, ठाणानाका रोड उंच जलकुंभ, एच.ओ.सी. उंच जलकुंभ, व चौकोनी टाकी, मार्केटयार्ड उंच जलकुंभ येथुन होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

ब) शुक्रवार दि. २७/०९/२०२४ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल

१) गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ, भाजी मार्केट उंच जलकुंभ, सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ (गोलटाकी) व पटेल मोहल्ला उंच जलकुंभातुन होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

तरी नागरिकांनी याची नोंद घेवून मिळणारे पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

सही/–
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका

मा. जाधव साहेब कोर्ट
प्रोसेस फी जमा रू.

अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

**जाहीर नोटीस**

दिवाणी चौकशी अर्ज नं. १०३२/२०२४
निशाणी ६

**बेलापूर येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर, बेलापूर यांचे न्यायालयात**

श्री. मारूती निवृत्ती हिवाळे, ....अर्जदार
विरूध्द
श्रीमती. चतुराबाई निवृत्ती हिवाळे व इतर ३ .... जाबदार

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,
यापेक्षा **कै. बबिता निवृत्ती हिवाळे** यांचे दिनाक **११.०३.२०१८ रोजी गणेश नगर, तुर्भे नाका, तालुका–ठाणे, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र** येथे मयत झाले असून प्रस्तुतचे अर्जदार कं १ हया आई आणि अर्जदार क्र. २ हा भाऊ तसेच अर्जदार क्र. ३ व ४ हया बहिणी असुन त्यांचे कायदेशिर वारस आहेत.

**यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.**

| मिळकत अनु कं. | मिळकत |
|---|---|
| १ | रूम नं. ६२४८, गणेश नगर, तुर्भे नाका, नवी मुंबई |

वरील अर्जदार हे मयत **कै. बबिता निवृत्ती हिवाळे** यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील,

तसेच अर्जदार हे **कै. बबिता निवृत्ती हिवाळे** यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. १८/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्कयासह दिली .

सही/– कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा– अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर. बेलापूर

**जाहीर नोटीस**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, खालापुर यांचे न्यायालयात**

अर्ज क्रमांक :–२३९/२०२४

श्री. संतोष मधुकर महाब्दी,
रा. पौद पो. माजगांव ता. खालापुर } **अर्जदार**
विरुध्द
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
ग्रुपग्रामपंचायत कुंभिवली ता. खालापुर } **सामनेवाले**

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. जनार्दन साधु गायकवाड यांचा दिनांक ०३/०४/१९५४ रोजी मौजे कुंभिवली ता. खालापुर येथे घरीच आजारामुळे मयत झाले आहेत. ते मौजे कुंभिवली ता. खालापुर, जि. रायगड येथे राहत होते परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुपग्रापंचायत कुंभिवली यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने, अर्जदार यांनी कै. जनार्दन साधु गायकवाड यांच्या मृत्यूनोंदीचे आदेश जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी, ग्रुपग्रापंचायत कुंभिवली यांना करावेत त्यासाठी या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत कोणत्याही व्यक्तीची हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाच्या आत मे. न्यायालय खालापुर येथे हजर राहून हरकत घ्यावयाची आहे.
याद्वारे असे जाहिर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे. न्यायालय अर्जदार यांचा अर्ज मंजूर करेल व जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी, ग्रुपग्रापंचायत कुंभिवली यांना कै. जनार्दन साधु गायकवाड यांचा मृत्यूदाखला देणेबाबत आदेश करील याची दखल घ्यावी.
आज दिनांक २३/०९/२०२४ रोजी माझी सही न्यायालयाचे शिक्यासह दिली.

सही/–
(सुधाकर राठोड)
कार्यकारी दंडाधिकारी तथा
निवासी नायब तहसिलदार
खालापुर

**जाहीर नोटीस**

**अलिबाग येथील उपविभागीय अधिकारी अलिबाग यांच्या न्यायालयात**

समृध्दी संतोष साटम ... **अपिलार्थी**
विरुध्द
हर्षद सुधीर साखळकर ... **उत्तरार्थी**

सर्व लोकांस कळविण्यात येते की, सदर नोटीसीत वर्णन केलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत अपिलार्थी यांनी या न्यायालयात **संकीर्ण अपिल क्र. १६७/२०२३** दाखल केले आहे.

| अ.क्र. | गावाचे नांव | स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे राजेवाडी, ता. अलिबाग | ५ | १–७०–०० पैकी १–००–०० | १६.५० |

सदर अपिलाच्या सुनावणीच्या नोटीसा अपिलार्थी व उत्तरार्थी यांना देण्यात आल्या असता, खाली नमूद केलेल्या उत्तरार्थीना नोटीसांची बजावणी झाली नसल्याने अपिलार्थी यांनी स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याची विनंती केली आहे.

**उत्तरार्थीचे नाव :**

**१. श्री. हर्षद सुधीर साखळकर,**
**२. श्रीम. सुलोचना बाळकृष्ण सोमरपूरकर,**
**३.श्री. मणिक भालचंद्र वागळे,**
**४. श्रीम. सुलोचना चिंतामण तेंडुलकर,**
**५. श्रीम. प्रभावती चिंतामण तेंडुलकर,**
**६. श्रीम. सरस्वती चिंतामण तेंडुलकर,**
**७. श्रीम. शिल्पा मदन तेंडुलकर**
**८. श्री. देवव्रत मदन तेंडुलकर,**
**९. श्री. रश्मीकांत यशवंत वागळे,**
**१०. श्री. चंद्रशेखर यशवंत वागळे,**
**११. श्रीम. शिला सुरेश वागळे,**
**१२. श्री. अभिजित सुरेश वागळे,**
**१३. श्री. सुधीर नारायण साखळकर,**
**१४. श्री. राहुल सुधीर साखळकर,**
**१५. श्रीम. उज्वला विनायक वागळे,**
**१६.श्री. आशिष विनायक वागळे,**
**१७. श्रीम. श्रेया विनायक वागळे,**
**१८. श्रीम. विनीता बॅस्टीयन,**
**१९. श्रीम. वसुधा शिरीष गर्दे,**
**२०. श्री. प्रसाद मधुसुदन तेंडुलकर,**
क्र.१ ते २० रा.राजेवाडी, पो. रामराज, ता. अलिबाग, जि. रायगड

अपिलाची पुढील सुनावणीची तारीख दि.२२/१०/२०२४ रोजी निश्चित करण्यात आली आहे. वरील उत्तराधी यांनी सुनावणीकामी स्वतः किंवा प्रतिनिधी यांच्यामार्फत उपरोक्त सुनावणीच्या तारखेस व वेळी या न्यायालयात हजर रहावे, सुनावणी कामी आपण स्वतः किंया आपल्या प्रतिनिधी मार्फत गैरहजर राहिल्यास कागदपत्रांच्या आधारावर गुणवत्तेवर निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सही/–
(मुकेश चव्हाण)
उपविभागीय अधिकारी अलिबाग
उपविभाग अलिबाग

## निवडक

### दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**नवी मुंबई :** दुचाकीच्या अपघातामध्ये १६ वर्षीय तरुणाच्या मृत्यूची घटना पामबीच मार्गावर घडली. सोमवारी रात्री भीषण अपघात घडला. करावे येथे राहणारा शिवम पाटील (वय १६) हा मित्रासह इलेक्ट्रिक स्कूटरवरून वाशीला आला होता. ८:३० च्या सुमारास तो परत करावेकडे चालला होता. मोराज चौकालगत त्यांची स्कूटर पावसामुळे निसरड्या झालेल्या रस्त्यावरून घसरली. शिवम व त्याचा मित्र रस्त्यावर पडले असता, शिवमच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला.

### नोटा छापणाऱ्या जोडप्यास अटक

**नवी मुंबई :** फायनान्सियल इंटेलिजन्स युनिटने नवी मुंबईमध्ये मोठी कारवाई करत दोघांना अटक केली आहे. एक महिला आणि एक पुरुष नवी मुंबईतील महापे येथील लॉजमध्ये फेक नोटा छापत असल्याची माहिती युनिटला मिळाली होती. आरोपींचे नाव विवेक कुमार प्रेमबाबु पिपळे (वय ३५) आणि अश्विनी विश्वनाथ सरोदे (वय ३६) असे आहे.

### ऐरोलीत २६ हजारांचा गांजा जप्त

**नवी मुंबई :** ऐरोली सेक्टर १ परिसरात महिला गांजा विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यावरून पथकाने रविवारी परिसरात सापळा रचला होता. यामध्ये संशयित वर्णनाची महिला नजरेस पडताच तिला ताब्यातघेऊन झडती घेण्यात आली. या वेळी तिच्याकडे २६ हजार रुपये किमतीचा ६४८ ग्रॅम गांजा मिळून आला. याप्रकरणी तिच्यावर रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहे.

### कारवाईची भीती दाखवून गंडवले

**नवी मुंबई :** पतीचा मनी लॉड्रिंगमध्ये सहभाग असल्याची महिलेला भीती दाखवून एक कोटी २८ लाख रुपये लुटल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खात्यातले पैसे चौकशीसाठी घेण्याच्या बहाण्याने ही फसवणूक झाली आहे. खारघर परिसरात राहणाऱ्या ५६ वर्षीय महिलेसोबत हा प्रकार घडला आहे.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर व भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप चिपळे व चिपळाई ग्रुप यांच्या माध्यमातून गावातील स्मशानभूमी परिसर साफ करण्यात आला असून पाण्याची टाकी मोफत बसवण्यात आली.**

# मोहोपाड्यात कचरा खाल्ल्याने गायीचा मृत्यू

## गोशाळा बांधून व्यवस्था करण्याची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा नवीन पोसरी बाजार पेठेत मोकाट फिरणाऱ्या गुरांची संख्या वाढलेली असून येथे कचरा साम्राज्य वाढले आहे. हा कचरा गुरांनी खाल्ल्याने त्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. यामुळे या गुरांसाठी गोशाळा बांधून तेथे गुरांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी विश्वहिंदू परिषद बजरंग दलाच्या गोरक्षकांसह नागरिक करत आहेत.



नुकताच बाजारपेठेत गुरांमधील एक गाय चक्कर येऊन धडपडत चालत असल्याचे जनार्दन गायकवाड यांनी रसायनीचे गोरक्षक प्रमुख मल्लेश गुडसे व प्रशांत तांबोळी यांना सांगितले. या वेळी गोमाता रक्षकांनी पशुवैद्य डॉ. कोकरे यांना कळविले. परिस्थिती पाहता डॉक्टरांनी गाय पडलेल्या ठिकाणी येऊन औषधोपचार सुरू केले. दुपारची वेळ असल्याने गोरक्षकांनी ऊन लागू नये म्हणून ताडपत्री बांधून सावली केली. डॉक्टरांनी सलाईन व इंजेक्शन देऊन गायीचा जीव वाचविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. शिळे टाकलेल्या खरकट्यातून गुरांच्या पोटात हे अन्न गेल्याने त्यांना विषबाधा होऊ शकते. कधी-कधी खरकट्यासोबत प्लास्टीकही गुरांच्या पोटात जाते. शर्थीचे प्रयत्न करूनही गायीचा जीव वाचू शकला नाही. त्यातूनही अन्नविषबाधा होऊन मोकाट गुरांच्या जीवावर बेतले जात आहे.

गायीला वाचविण्यासाठी बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनीही मदत केली. गायीच्या दफन विधीसाठी एका विक्रेत्याने मिठाची गोणी दिली. या वेळी गोमाता रक्षकांनी ही हकिकत सांगून पत्रकार राकेश खराडे यांना फोन करून जेसिबीची गरज असल्याचे सांगितले. खराडे यांनी माजी सरपंच संदीप मुंढे यांच्याशी फोनवरून चर्चा करून जेसीबी मागितली. या वेळी जेसीबी ऑपरेटरला बोलावून नवीन पोसरी येथे जेसिबी पाठविली. मृत गाईवर मोहोपाडा अचानक मैदानाच्या बाजूला खड्डा करून तिचे विधिवत पुजन करुन अंत्यसंस्कार करण्यात आले.

परिसरात मोकाट गुरे उघड्यावरचा कचरा खात असल्याने तसेच रहदारीच्या रस्त्यावर आपले बस्तान मांडत असल्याने जीव गमावत आहेत. गुरांना उघड्यावर सोडणाऱ्या मालकांवर कारवाई व्हावी, अशीही मागणी परिसरात जोर धरू लागली आहे.

# हिमालयन गौरा गणपती महोत्सव

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री गुरुशक्तीच्या अनुकंपा अंतर्गत, मुंबई हार्बर झोन १ आणि २ तर्फे आयोजित श्री हिमालयन गौरा गणपती महोत्सव पनवेलमधील सीकेपी सभागृहात झाला. या महोत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. त्यांनी आयोजित ध्यान योगाचे प्रदर्शनी पाहून ध्यानधारणेची माहिती घेतली व सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यासोबतच भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, आरएसएस खारघरचे सहनगरकार्यवाह विक्रम सिंह या मान्यवरांनी श्री हिमालयन गौरा गणपती बाप्पाचे दर्शन घेतले.



या महोत्सवात तरुणांनी पुढाकार घेतला आणि मुंबई हार्बर झोन व्यतिरिक्त मुलुंड, डोंबिवली, अंधेरी, ठाणे येथील सर्व साधक, आचार्य आणि क्षेत्रीय आचार्य गुरुकार्यासाठी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी 'योग ते समग्र योग' या प्रदर्शन व मेळाव्याला भेट दिल्यानंतर तरुणांना संबोधित करताना हिमालय समर्पण व ध्यानयोग परिवाराला सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

# बीसीटी विधी महाविद्यालयात हिंदी दिवस






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात सोमवारी (दि.२३) हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सेमिनार हॉलमध्ये झालेल्या हा कार्यक्रम प्रभारी प्राचार्या सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तर बी.ए.एल.बी.च्या समन्वयक धनश्री कदम यांच्या उपस्थितीत झाला. राष्ट्रीय दिन उत्सव समितीचे संग्राम पवार यांच्यासह हिंदी साहित्य मंडळाच्या प्रभारी प्राध्यापक रवनीश बेकर यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे दोन्ही आयोजकांनी जंगी स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस व पाचव्या वर्षाची विद्यार्थिनी प्रेरणा गायकवाड यांनी केले.

प्राध्यापकांच्या योगदानामुळे हा उत्सव लक्षणीय रीतीने समृद्ध झाला. अपराजिता गुप्ता, अनम मेहंदीकर आणि ॲड.दीपाली बोहरा यांनी हिंदी भाषेचे सांस्कृतिक व साहित्यिक महत्त्व अधोरेखित करणारे काव्य व साहित्य सादर केले. त्यांच्या अंतर्दृष्टीमुळे हिंदी साहित्याविषयी प्रेक्षकांचे कौतुक अधिक चव्हाट्यावर आले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणात भाषणे, पठण, दोहा आणि शेर-ओ शायरी यांचा समावेश होता, ज्यामुळे समकालीन काळातील हिंदीची प्रासंगिकता दिसून आली. एलएलबीच्या द्वितीय वर्षाचे विद्यार्थी कृतेश्वर सिंग, सुनील कठाळे, प्रथमेश देठे, भूषण पाटील आणि तृतीय वर्षाचे विद्यार्थी अनिल गमारे सहभागी झाले होते.

या उत्सवात हिंदी ही भारतीय संस्कृतीतील एकसंध शक्ती म्हणून अधोरेखित करण्यात आली, भाषेच्या समृद्ध वारशाचा यशस्वीपणे प्रचार केला गेला आणि समाजातील तिच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल सखोल कौतुक वाढले. हिंदीचा वारसा आणि आधुनिक जगात तिची निरंतर प्रासंगिकता याबद्दल अभिमानाच्या भावनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# मुलींना वेश्याव्यवसायात ओढणारा दलाल जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

गोर गरीब मुलींचा, महिलांचा देह व्यवसायासाठी उपयोग करणारा दलाल नवी मुंबई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाकडून जेरबंद करण्यात आला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या पथकाकडून कामगिरी करण्यात आली आहे.

आरोपी वैजद अली खान उर्फ राजू मंडल (वय २९) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर संशयित मोतीन व शायना यांचा पोलीस शोध घेत आहेत. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाकडून वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या नेत्तृत्वाखाली पनवेलमधील करंजाडे परिसरात सापळा कारवाईत या दलाला अटक करण्यात आली. यासंबंधित आणखी दोघांचा शोध पोलीस घेत आहेत. सापळा कारवाईत तीन महिला व एक बांगलादेशी महिला यांची सुटका करण्यात आली.

आरोपी वैजद अली खान उर्फ राजू मंडल हा कुख्यात दलाल असून तो मोतीनच्या साथीने गरीब महिलांना पैशाचे आमिष देऊन त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत होता. कारवाईत आढळून आलेल्या अल्पवयीन बांगलादेशी मुलीचा पुरवठा शायना या महिला दलालाने केला असल्याची माहिती उघडकीस आली आहे.

याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तिघांविरोधात पिटा अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून स्वच्छता अभियान

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाच्या निमित्ताने मंगळवारी (दि.२४) पेठपाडा येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली म्हणून दरवर्षीप्रमाणे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या दरम्यान स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे या उपक्रमांकर्गत स्वभाव स्वच्छता- संस्कार स्वच्छता हा उपक्रम राबवण्यात येत आहे याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीनी स्वच्छता मोहीम राबविली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या स्वच्छता अभियानामध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शुभम शर्मा व समितीतील सर्व सदस्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.





**पनवेल : विचुंबे पंचायत समिती भाजप अध्यक्ष तथा वांगणीतर्फे वाजे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सतीश मालुसरे यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील, उपसरपंच प्रवीण पालव, सुनील पाटील, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजित पाटील, अक्षय पाटील, अभिनय पाटील उपस्थित होते.**

# मृत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस एका मृत व्यक्तीच्या नातेवाईकाचा शोध करीत आहेत.

मयत व्यक्तीचे नाव संजय जशराज पांडे (वय ३५) असे असून रंग गोरा, अंगाने सडपातळ, केस काळे, दाढी मिशी काळी वाढलेली असून, अंगात लाल फुल बाह्याचा टी-शर्ट व ग्रे फुल पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक उद्धव सोळंके यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जासई विद्यालयात कर्मवीर जयंती

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षण महर्षी, पद्मभूषण, डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती मोठ्या उत्साहात रविवारी (दि.२२) साजरी करण्यात आली.



विद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या महापुरुषांच्या पुतळयास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून, विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे यांच्या शुभहस्ते कर्मवीरांच्या पालखीचे पूजन केले. फुलांनी सजवीलेल्या कर्मवीरांच्या पालखी मिरवणुकी सोबत विद्यालयाचे लेझीम पथक, ढोल ताशा, बँड पथक आणि सर्व विद्यार्थी कर्मवीरांच्या जयघोषाने संपूर्ण जासई गावातून पालखी मिरवणूक फिरविण्यात आली.

या वेळी गावातील माता पालक, ग्रामस्थ आणि सुवासिनिंनी कर्मवीरांच्या पालखीचे पूजन करून आशीर्वाद घेतले. आकर्षक पोशाख आणि फेटे परिधान केलेल्या लेझीम पथकाने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले होते. संपूर्ण जासई गाव कर्मवीरांच्या जयघोषाने दुमदमून गेले होते.

विद्यालयाचे प्राचार्य तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे यांच्या मार्गदर्शन व नियोजनानुसार विद्यालयातील सर्व सेवक, विद्यार्थी यांनी हा पालखी मिरवणूक सोहळा यशस्वी केला. तसेच स्थानिक पोलीस प्रशासन यांनीही उत्तम सहकार्य केले.

या पालखी मिरवणूक सोहळ्यासाठी विद्यालयाचे शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, कामगार नेते सुरेश पाटील, व्हॉईस चेअरमन डी. आर. ठाकूर, नरेश घरत, रघुनाथ ठाकूर, सुभाष घरत, यशवंत घरत, रजनी घरत,रमेश पाटील, महाराष्ट्र राज्य रयत सेवक संघाचे समन्वयक नुरा शेख, टी.टी. घरत आणि ग्रामस्थ व शिक्षण प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काळुंद्रेत जिम साहित्याचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील काळुंद्रे गावात १२ लाख रुपयांच्या निधीमधून जिमचे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. या साहित्याचे उद्घाटन मंगळवारी (दि. २४) अनंत पाटील यांच्या हस्ते आणि माजी उपमहापौर चारुशीला घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

पनवेल महापालिका क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून काम सुरू आहे. त्याचप्रमाणे नगरसेवकांच्या माध्यमातूदेखील पाठपुरावा करून अनके विकासाची कामे मार्गी लागत आहेत. त्यानुसार प्रभाग क्रमांक २०मधील काळुंद्रे गावातील तरुणांनी जिम साहित्य उपलब्ध करुन देण्याची मागणी त्यांच्याकडे केली होती. त्यानुसार पनवेल महपालिकेच्या वतीने १२ लाख रुपयांच्या निधीमधून जिमचे साहित्य उपलब्ध झाले आहे.

याचे उद्घाटन मंगळवारी करण्यात आले. या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे, प्रभाकर बहिरा, प्रभाग अध्यक्ष रघुनाथ बहिरा, अनंत पाटील, बाळाराम चिखलेकर, शंकर म्हात्रे, कमाल म्हात्रे, विशाल म्हसकर, सचिन चिखलेकर, कुणाल म्हात्रे, प्रतीक भोईर, कल्पेश पाटील, अमर पाटील, सचिन चिखलेकर, प्रसाद म्हात्रे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



# ऐरोलीमध्ये पालिकेच्या उद्यानात आढळला साप

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली सेक्टर १८ येथील कै. रामदास बापू पाटील उद्यानात सोमवारी (दि.२३) स्वच्छता मित्र नंदा भोईर या सकाळी १० वाजता उद्यानात साफ सफाई चे काम करीत असताना त्यांना साप आढळून आला.



स्वच्छता मित्र भयभीत झाल्याने त्यांनी समोरील उद्यानात काम करत असलेले सह कर्मचारी प्रदीप वानखेडे यांना बोलावून घेतले तो पर्यंत साप गवतात गेला होता, मात्र वानखेडे यांनी ताबडतोब सर्पमित्र संचित यांना पाचारण केले. त्यांनी घटना स्थळी धाव घेऊन त्या सापास पकडले. त्याची तपासणी करून त्यास नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले. या वेळी वानखेडे यांनी उपस्थित पालिकेच्या स्वच्छता मित्रांना सपाविषयी माहिती दिली. साप दिसल्यावर मारू नका, निसर्गचक्रात साप हे मोलाची भूमिका बजावतात, अशी माहिती दिली.

उद्यान माळी कामगार प्रशांत मोरे यांनी माहिती दिली की, आम्ही उद्यानाची साफ सफाई करतो पावसाळ्यात गवत वाढले असल्याने साप, विंचू असे सरपटणारे प्राणी गवतात फिरत असतात मात्र तरीही आमचे कामगार जीवाची पर्वा न करता आपले काम प्रामाणिक पणे काम करतात. उद्यानाची निगा आमचे सर्व कामगार करत असतात. सर्प आढळल्यास आम्ही तातडीने सर्पमित्रांना कळवत असतो.


निवडक

## सुमय्या मल्ली हिचा सत्कार



**माणगाव** : उम्मत-ए-मुस्लीमा कमिटीतर्फे रायगड पोलीस दलात भरती झाल्याबद्दल तालुक्यातील गोरेगाव येथील सुमय्या इब्राहिम मल्ली हिचा पालकांसमवेत रविवारी (दि.२२) ईद-ए-मिलादनिमित्त आयोजित कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. या वेळी नगरसेवक प्रशांत साबळे, दिनेश रातवडकर, उम्मत-ए-मुस्लीमा कमिटीचे मुफ्ती मुझफ्फर सेन, अकबर परदेशी, सिराज परदेशी, शादाब गैबी, बशीर करेल, सर्फराज अफवारे, सिराज अफवारे, फहद करबेळकर, शहानवाज अत्तार, नदीम परदेशी, इरफान हाजीते, रफिक जामदार, शाजान जळगावकर, अफाक दांडेकर, रिहाना मुल्ला, सुहेब परदेशी यांच्यासह सर्व सदस्य उपस्थित होते.

## रोह्यात पावसाची दमदार हजेरी



**रोहे** : शहरासह तालुक्यात काही दिवसांच्या विश्रांतीनंतर सोमवारी (दि.२३) सायंकाळी रिमझिम पावसाने सुरुवात केली. ढगांच्या गडगडाटासह सायंकाळी पाऊस पडत होता. त्यामुळे काही प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले. गणेशोत्सवादरम्यान पावसाने विश्रांती घेतली होती. त्यामुळे गणेशोत्सव आनंदाने साजरा झाला, परंतु गणेशोत्सव झाल्यानंतर पावसाने पुन्हा सुरुवात केली आहे. बंद झालेल्या छत्र्या पुन्हा पावसामुळे उघडल्या गेल्या आहेत. पावसामुळे सायंकाळी रस्त्यावर तुरळक वाहतूक होती.

## श्री सद्गुरू पतसंस्थेची सभा



**रेवदंडा** : चौल येथील श्री सद्गुरू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष प्रवीण राऊत यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या वेळी पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुधाकर म्हात्रे, सेक्रेटरी असिफ किरकिरे, खजिनदार प्रतीक्षा राऊत, संचालक प्रथमेश राऊत, संचालिका शुभांगी पाटील, विश्वनाथ म्हात्रे, संचालिका ज्योती म्हात्रे, योगिता नाईक, संचालक प्रवीण बाजी, कायदेशीर सल्लागार ॲड. महेश म्हात्रे, व्यवस्थापक महेंद्र म्हात्रे, उपव्यवस्थापक निलेश राऊत आदींसह सभासद उपस्थित होते. या सभेत मागील सभेचे इतिवृत्तात वाचन करून मंजूर करणे, आर्थिक वर्षाचा अहवाल वाचून मंजूर करणे, २०२४-२०२५च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे, सभासदांना प्रशिक्षण देणे, साई निर्मल गणेश योजनेंतर्गत गरजूना मदत देणे, सभासदांना भेटवस्तू देणे, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आदी कार्यक्रम घेण्यात आले. पतसंस्थेच्या वतीने चौल व रेवदंडामधील सहा गरजू महिलांना पाच हजार रु. मदतनिधी म्हणून देण्यात आला.

# ई-रिक्षांची संख्या वाढवण्याची गरज

## माथेरानमध्ये स्थानिक, पर्यटकांसाठी सेवा पडतेय अपुरी



**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहरात २० ई-रिक्षा वर्षभरासाठी प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहेत. पावसाळी पर्यटनात झालेली वाढ लक्षात घेता आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी ई-रिक्षा सेवा देणे बंधनकारक असल्याने माथेरान शहरात सुरू असलेल्या २० ई-रिक्षा अपुऱ्या पडत आहेत. याकरिता याठिकाणी ई-रिक्षांच्या संख्येत वाढ करण्याची अत्यंत गरज असल्याचे स्थानिक नागरिकांमधून बोलले जात आहे.

माथेरान पर्यटनस्थळी प्रायोगिक तत्त्वावर प्रदूषणमुक्त बॅटरीवर चालणाऱ्या ई-रिक्षा सुरू झाल्या आहेत. ई-रिक्षांमुळे शाळेत दूरवर जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, दिव्यांग बांधव, ज्येष्ठ पर्यटकांना येथे माथेरान शहरात दाखल होणे सोईस्कर झाले आहे. या ई-रिक्षा सुरू झाल्यापासून पर्यटकांच्या संख्येत कमालीची वाढ झालेली येथे दिसत आहे. यंदा पावसाळ्यातसुद्धा दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक या पर्यटनस्थळी दाखल झाले होते. यामुळे येथील व्यवसायात आणि पालिकेच्या तिजोरीत चांगलीच भर पडलेली दिसून आली.

माथेरानमधील वाढते पर्यटन पाहता येथे सुरू असलेल्या २० ई-रिक्षा स्थानिकांना आणि पर्यटकांना सेवा देण्यास अपुऱ्या पडताना दिसत आहेत. याठिकाणी ई-रिक्षाकरिता तासन्तास पर्यटक रांगेत उभे असल्याचे चित्र अनेकदा येथे पहावयास मिळते. त्याचबरोबर येथे स्थानिकांनादेखील ई-रिक्षासाठी बराच वेळ वाट पहावी लागते.

विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी सकाळी साडेसहा वाजेपासून ई-रिक्षा सुरू होतात. त्यानंतर दुपारी १ वा.पर्यंत येथे ई-रिक्षाची बॅटरी डिस्चार्ज होऊन ई-रिक्षा पुन्हा ३.३० ते ४ तास चार्जिंगसाठी बंद करावी लागते. मग अशावेळी फक्त तीन ते चार ई-रिक्षा नागरिकांना आणि पर्यटकांना येथे सेवा पुरवीत असतात. त्यामुळे अनेकवेळा गोंधळाची परिस्थिती निर्माण होत असते. यावर ई-रिक्षांची संख्या वाढवणे हा एकमेव पर्याय असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

**सर्वोच्च न्यायालयाने सनियंत्रण समितीला ई-रिक्षांची संख्या निश्चित करण्याचा अधिकार दिला आहे. संघटनेच्या वतीने सातत्याने मागणी करीत आहोत. स्थानिकांनीदेखील ई-रिक्षासाठी मागणी केल्यास सनियंत्रण समितीलाही दखल घ्यावी लागेल. सर्वांच्या प्रयत्नाने प्रश्न मार्गी लागू शकतो.**

**-सुनील शिंदे,**
**सचिव, रिक्षा संघटना**

# भाजप महिला मोर्चाध्यक्ष अश्विनी पाटील यांना मान्यवरांकडून शुभेच्छा





**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गर्दी केली होती.

या वेळी महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष अश्विनी अत्रे व त्यांच्या महिला मोर्चाच्या सहकारी कार्यकर्त्या विभावरी पाठक, अपर्णा साठे, स्नेहल सावंत, सुमती महर्षी, रसिका शेटे, अनिता शाह, सीमा मोगरे, आदींसह भारतीय जनता पक्षाचे खोपोली शहर अध्यक्ष रमेश रेटरेकर, सरचिटणीस राहुल जाधव, हेमंत नांदे, उपाध्यक्ष दिलीप पवार, श्री. पाटील, चिटणीस विनायक माडपे आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर व पत्रकार, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रायगड कॉलेजमध्ये एम.फार्मसी

**महाड** : रायगड कॉलेज ऑफ फार्मसीला २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात दोन विषयात मास्टर ऑफ फार्मसी या अभ्यासक्रमाला फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाकडून मान्यता मिळाली आहे. या कोर्स अंतर्गत एम. फार्म (फार्मास्युटिक्स) आणि एम. फार्म (फार्मास्युटिकल क्वालिटी अॅशुरन्स) या विषयांच्या प्रत्येकी १५ जागांचा समावेश आहे.


**महाराष्ट्र शासन**

**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड**
**जिल्हा रायगड ४०२३०१**
**Email:-rpdmahad.ee@mahapwd.com Ph. No.** 02145 222243

**NOTICE INVITING e-TENDER**
**Notice No. 07 for 2024-25**

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक), मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडुन बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग, महाड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत | इसारा / बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | किल्ले रायगडावर होळीचामाळ ते चित्तदरवाजा पदपथाची देखभाल दुरुस्ती करणे. | ५४१७८३४.०० | ५५०००.०० | ६ महिने | ११८० | वर्ग ४ व वरील |
| २ | मांघरुन आदिवासीवाडी अंतर्गत रस्ता तयार करणे, त.. महाड, जि. रायगड. | २९७३०९८.०० | ३००००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ५ अ व वरील |
| ३ | मौजे पुनाडे मुळ गावठाण येथे विहीर बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | २२३८२१९.०० | २३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| ४ | देवघर अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | २११७८५५.०० | २२०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| ५ | मांघरुन येथे सभामंडप बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | २०८६६२४.०० | २१०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| ६ | वाळसुरे दत्तवाडी अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | २०७४४३०.०० | २१०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ वा वरील |
| ७ | सांदोशी आमडोशी धनगरवाडी अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | १६९२२६८.०० | १७०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| ८ | वाघेरी आदिवासी वाडी रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | १६९१७०८.०० | १७०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| ९ | हिरकणी वाडी सभा मंडप बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | १६७६७२८.०० | १७०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १० | मौजे पुनाडेवाडी येथे विहीर बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | १६७३६७६.०० | १७०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ च वरील |
| ११ | खर्डी नगरभुवन येथे विहीर बांधणे, ता महाड, जि. रायगड. | १६७०८१०.०० | १७०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १२ | कावळे तर्फे नाते येथे अंतर्गत रस्ता तयार करणे, त्ता. महाड, जि. रायगड. | १६४५६९७.०० | १७०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १३ | ग्रा.पं. निजामपुर रायगडवाडी परडी येथे विहीरीचे बांधकाम करणे ता. महाड, जि. रायगड. | १५०९०६५,०० | १६०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १४ | खर्डी अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड, | १२६७६४९.०० | १३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १५ | मौजे पुनाडेवाडी येथे स्मशानभुमी बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | १२६५७४६.०० | १३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १६ | खर्डी नागरभुनव येथे अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | १२६१३५०.०० | १३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १७ | कोंझर येथे अंतर्गत रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | १२६०८४३.०० | १३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १८ | कोंझर येथे सभामंडप बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | १२४०१२२.०० | १३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| १९ | कोंझर येथे स्मशानभुमी बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | १२२७४९७.०० | १३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| २० | पाचाड नाका बेंदुगडे आळी येथे नाला बंधीस्ती करणे, ता. महाड, जि. रायगड. | १२२६४८०.०० | १३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| २१ | खडकीवाडी ते नेवाळीवाडी रस्ता घाट सुधारणा करणे, ता. महाड, जि. रायगड. | ६३१०२८५.०० | ६४०००,०० | ६ महिने | ११८० | वर्ग ५ व वरील |
| २२ | आमडोशी धनगरवाडी ते परडी रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | ५४९०३०३.०० | ५५०००.०० | ६ महिने | ११८० | वर्ग ५ व वरील |
| २३ | पाचाड ते शिंदे आव्हाड रस्ता तयार करणे, ता. महाड, जि. रायगड. | २४७६४१७.०० | २५०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| २४ | पाचाड मोहल्ला स्माशानभुमी व संरक्षण भिंत बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | १६९२०८५.०० | १७०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |
| २५ | रायगडवाडी बौध्द समाजासाठी सभागृह बांधणे, ता. महाड, जि. रायगड. | १२५००८७.०० | १३०००.०० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२०/०९/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२७/०९/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत. |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | मा. कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, महाड यांचे कार्यालयात दि. ३०/०९/२०२४ रोजी ११.०० पासून |

**टिप:-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

**सही/**
**(सलोनी स. निकम)**
**कार्यकारी अभियंता**
**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)**
**मार्ग प्रकल्प विभाग, महाड जिल्हा रायगड**

**रा.कि. सेल/माप्रवि/महाड/निविदा/४६६**
**दिनांक : १८/०९/२०२४**


# अलिबाग तालुक्यातील सहा समुद्रकिनाऱ्यांची स्वच्छता

## १० टन कचऱ्याची विल्हेवाट

**खोपोली : प्रतिनिधी**

सागरी किनारा स्वच्छता दिनाचे औचित्य साधून अलिबाग तालुक्यातील सहा समुद्रकिनारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पर्यावरण संरक्षण गतिविधी, सामाजिक संस्था, नगरपालिका कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ अशा ४८० जणांनी मिळून स्वच्छ केले.

दहा टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आला व त्याची योग्यप्रकारे विल्हेवाट लावण्यात आल्याची माहिती संघाचे जिल्हा पर्यावरण संरक्षण गतिविधि संयोजक अतुल कोठारी यांनी दिली. दरवर्षी सप्टेंबर महिन्यातील तिसरा शनिवार जागतिक सागरी किनारा स्वच्छता दिन म्हणून संपूर्ण जगामध्ये साजरा केला जातो. त्यानिमित्ताने जगातील सर्व सागरी किनारे एकाच दिवशी स्वच्छ केले जातात. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, वरसोली, नागाव, आवास, थळ आणि किहीम असे सहा सागरी किनाऱ्यावर स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

दहा टन कचरा, प्लास्टिक गोळा करून नगरपालिका आणि ग्रामपंचायतीने सोय करून दिलेल्या घंटागाडीमध्ये टाकण्यात आला. काही प्लास्टिक रिसायकलिंगसाठीसुद्धा पाठवण्यात आले. खोपोली नगरातून ५३ जण या अभियानात सहभागी झाले होते. त्यांनी पर्यावरणा च्या बाबतीत जनतेपर्यंत स्वच्छ समुद्र आणि स्वच्छ सागरी किनारे हा संदेश पोहोचवला. ग्रीन अँड ग्रीन इंडिया इंटरनॅशनल या संस्थेने टी-शर्ट आणि बॅनर दिले. संतोष थोरात आणि अधिकारी संस्थेकडून हजर होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पर्यावरण संरक्षण गतिविधी संयोजक अतुल कोठारी, माजी संघचालक राकेश पाठक, अलिबाग तालुका कार्यवाह अमेय केळकर, सुशील सायकर, खालापूर तालुका कार्यवाह गौरव तटकरे, सुधाकर भट, विरेश्वर शाखेचे स्वयंसेवक, सावरकर शाखेचे स्वयंसेवक उपस्थित होते.



# खोपोली कोमसापतर्फे कविसंमेलन उत्साहात



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील कोमसाप शाखेतर्फे शिशूमंदिर शाळेचे माजी मुख्याध्यापक व खोपोली-पाली रोडवर इमॅजिकाच्या पुढे असलेल्या अशोक पाटील उर्फ आत्मानंद महाराज यांच्या श्री आत्मानंद आश्रमात बहारदार कविसंमेलन उत्साहात पार पडले.

कोमसाप अध्यक्ष उज्ज्वला दिघे यांच्या नेतृत्वाखाली एकूण २२ सदस्य उपस्थित होते व आश्रमातील काही साधक तसेच आत्मानंद महाराज यांच्या सहकार्याने हे कविसंमेलन उत्साहात संपन्न झाले. प्रारंभी उपाध्यक्ष प्रकाश राजोपाध्ये यांनी सर्व उपस्थितांचे आश्रमात स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, शाखेचे कार्याध्यक्ष नरेंद्र हर्डीकर यांनी केले. त्यानंतर प्रकाश राजोपाध्ये यांनी काव्यसंमेलनाला सुरुवात केली.

जनार्दन सताणे यांच्या प्रार्थना गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. आत्मानंद महाराज यांनी आपली एक कविता सादर केली. त्यानंतर उज्ज्वला दिघे, जयश्री पोळ, रेखा कोरे, अनिलकुमार रानडे, शितल अहिर, सुरेश चव्हाण, महेश निमणे, नरेंद्र हर्डीकर, विजय घोसाळकर, मुळीक सर, नन्नावरे सर, संतोष वाघ, प्रकाश राजोपाध्ये, शैलजा देशमुख, उल्हासराव देशमुख, प्रवीण पुरी यांनी विविध कविता, गाणी, ललित कलाकृती सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# दानशूर लोकनेते मा. खासदार रामशेठ ठाकूरसाहेब रायगडचे आधुनिक कर्ण

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक कर्तृत्ववान आणि दानशूर व्यक्तिमत्व म्हणून ज्यांची ख्याती आहे असे रायगडचे सुपुत्र माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांचा सातारा येथे रयत शिक्षण संस्थेतर्फे अध्यक्ष तथा खासदार श्री. शरदचंद्र पवारसाहेब यांच्या शुभहस्ते सन्मान झाला. लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांबद्दल सांगायचं झालं तर कुठलेच क्षेत्र असे नाही की त्या क्षेत्रामध्ये रामशेठ ठाकूरसाहेबांचे बहुमूल्य योगदान नाही. रामशेठ ठाकूरसाहेबांची काम करण्याची पद्धतच इतर राजकीय नेत्यांपेक्षा वेगळी आहे. बऱ्याच नेत्यांकडे गडगंज संपत्ती आहे, परंतु जनकल्याणासाठी दान करण्याचं उद्दात मन फक्त रामशेठ ठाकूरसाहेबांकडे आहे. उद्योगात पैसे सर्वजण कमावतात, पण समाजासाठी, गोरगरीब, जनतेसाठी, विद्यार्थ्यांसाठी, दीनदुबळ्या पीडितांसाठी मदत करण्याची वृत्ती ही ठराविक व्यक्तींमध्ये असते आणि त्या व्यक्तींमध्ये महाराष्ट्रामधून जी मोजकी नाव घेतली जातात त्यामध्ये रामशेठ ठाकूरसाहेबांचं नाव पहिलं घेतलं जातं. त्याचं कारणही तसंच आहे गरिबांची मुलं शिकली पाहिजेत यासाठी खेडोपाड्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी उभ्या केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांसाठी गेल्या अनेक वर्षापासून कोट्यवधी रुपये दानधर्म केलेले महाराष्ट्रातील एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे रामशेठ ठाकूरसाहेब. त्याचबरोबर रामशेठ ठाकूरसाहेबांच्या जवळ मदतीसाठी आलेला कुठलाच व्यक्ती खाली हाताने परत जात नाही. रामशेठ ठाकूरसाहेबांकडे आलेल्या प्रत्येक व्यक्तीला योग्य तो सन्मान दिला जातो. शैक्षणिक क्षेत्रासोबत क्रीडा क्षेत्रातील रामशेठ ठाकूरसाहेबांचे काम उल्लेखनीय आहे. त्याचबरोबर संकटकाळात हजारो दीनदुबळ्या जनतेसाठी अन्नदानसुद्धा त्यांच्या माध्यमातून केलं जातं तसेच कुठेही नैसर्गिक आपत्ती आली तर रायगडमधून पहिली मदत ही रामशेठ ठाकूरसाहेबांकडून जाते. महाराष्ट्रात असा कुठला जिल्हा नाही की रामशेठ ठाकूरसाहेबांनी मदत केलेली नाही तसेच धार्मिक क्षेत्रातसुद्धा रामशेठ ठाकूरसाहेबांचे काम अतुलनीय आहे. अशा या रायगडाच्या सुपुत्राचा सन्मान म्हणजे समस्त रायगडवासीयांचाच सन्मान आहे, असे आम्ही समजतो. रयत शिक्षण संस्थेतर्फे सत्कार झाल्याबद्दल रायगडचे आधुनिक कर्ण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब यांचे हार्दिक अभिनंदन!

**–रूपेश मच्छिन्द्रनाथ धुमाळ,**
**भाजपा उत्तर रायगड चिटणीस**




ADVT.



















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com